cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८५ | रविवार दि.२ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सरकारने संवेदनशिल व्हावे

शेतकऱ्यांसाठीच्या विविध मागण्यांसाठी सुरू झालेल्या बच्चू कडू यांच्या आंदोलनावर सरकारने समिती स्थापनेचा उपाय शोधला आहे. कडू यांनी अनेक मागण्या केल्या असल्या तरी राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी आणि पावसाच्या जबरदस्त तडाख्याने झालेल्या नुकसानीसाठी शंभर टक्के नुकसान भरपाई या त्यातील दोन प्रमुख मागण्या आहेत.

# ऊस दरावरुन कारखानदारांची कोंडी होणार!

## पहिली उचल ३,४०० ते ३,४५० रुपये मान्य नसल्याचा राजू शेट्टी यांचा इशारा, आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**कोल्हापूर ऊस पट्ट्यात ऊस दरावरुन आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. पहिली उचल प्रतिटन ३,७५१ रूपये देण्यावरुन तोडगा निघाला नाही तर भूमिगत होऊन आंदोलनाची तीव्रता वाढवावी, अशी सूचना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी कार्यकर्त्यांनी केली. पहिली उचल ३,४०० ते ३,४५० रुपये मान्य नसल्याचे राजू शेट्टी यांनी स्पष्ट केले आहे. ऊस दरावरून आता कारखानदारांची कोंडी करण्याची तयार संघटनेने केली असल्याचे दिसत आहे.**



सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व कारखानदार एकत्रित ठरविल्याप्रमाणे प्रतिटनास ३,४०० ते ३,४५० रुपयांपर्यंत पहिली उचल देत आहेत. सदरची उचल आम्हाला मान्य नसल्याचे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. ऊस परिषदेत मागणी केलेल्या ३,७५१ रूपयावर तोडगा निघाला नाही तर भूमिगत होऊन आंदोलनाची तीव्रता वाढवावी, असे शेट्टी यांनी कार्यकर्त्यांना सांगितले आहे. कोल्हापूर, सांगली आणि कर्नाटकच्या सीमाभागात ऊस आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. राज्य सरकार हे साखर कारखानदार आणि शेतकरी संघटना यांच्यात मध्यस्थी करून गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी तोडगा काढेल, अशी अपेक्षा होती. पण राज्य सरकार आणि कारखानदार या मुद्याकडे दुर्लक्ष करत आहेत. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखान्यांनी एफआरपी जाहीर केलेली आहे. यामुळे कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर पान २ वर

## थोडक्यात...

### महाबीजकडून ७५ हजार क्विंटल रब्बी बियाणे पुरवठा

परभणीः या वर्षीच्या (२०२५) रब्बी हंगामात महाबीजच्या परभणी विभागातील परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, सोलापूर या सहा जिल्ह्यांमध्ये हरभरा, ज्वारी, गहू, करडई या पिकांच्या एकूण ९६ हजार ६०० क्विंटल बियाणे पुरवठा करण्याचे नियोजन असून, आजवर ७५ हजार क्विंटल बियाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे, अशी माहिती महाबीजचे विभागीय व्यवस्थापक जे. आर. खोकड यांनी दिली. कृषी विभागाकडून रब्बी हंगामातील प्रस्तावित क्षेत्र त्यानुसार आवश्यक बियाण्याची गरज लक्षात घेऊन महाबीजकडे बियाण्याची मागणी केली जाते. जिल्हानिहाय मागणीनुसार महाबीजकडून बियाणे पुरवठा केला जातो.

### महिलेला पाहून शिटी वाजवणे विनयभंगच

मुंबईः महिलेला पाहून शिटी वाजवणे, महिलेची ओढणी खेचणे हा विनयभंगाचाच गुन्हा आहे. अशा कृत्यामुळे महिलेच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो, असे निरीक्षण मुंबईतील बोरीवली येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी नोंदवले. तर या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. न्यायालयाने आरोपीला एक हजार रुपयांचा दंडही सुनावला आहे. याप्रकरणात एका तपानंतर निकाल लागला हे विशेष. निवाड्यामुळे टपोरी आणि रोडमजूनांना दणका बसला आहे. टवाळखोरांना यामुळे जरब बसणार आहे.

### आंध्र प्रदेशातील वेंकटेश्वर मंदिरात चेंगराचेंगरी; ७ ठार

श्रीकाकुलम : आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम येथील कासीबुग्गा वेंकटेश्वर मंदिरात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत. शनिवारी एकादशीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. यावेळी रेलिंग कोसळल्याने एकच गोंधळ उडाल्याने ही दुर्घटना घडली. जखमी भाविकांना रुग्णालयात नेण्यात आले. मृतांचा आकडा वाढण्याची भीती प्रशासनाने व्यक्त केली आहे. श्रीकाकुलम वेंकटेश्वर हे आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध मंदिर आहे. हे मंदिर ११ व्या शतकात, चोल आणि चालुक्य शासकांच्या प्रभावादरम्यान बांधले गेले असे मानले जाते. 'उत्तरेचा तिरुपती' अशी त्याची ओळख आहे. एकादशीनिमित्त मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी रेलिंग कोसळल्याने एकच गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली.

### ऑपरेशन सिंदूरमुळे भारताची क्षमता सिद्ध झाली

नवी दिल्लीः ऑपरेशन सिंदूरने युद्ध पद्धतीमध्ये क्रांतीकारक बदल घडवून आणला. यामुळे विविध आघाड्यांवरील युद्धासाठी भारताची क्षमता सिद्ध झाली, असे प्रतिपादन कर्नल सोफिया कुरेशी यांनी केले. दिल्लीतील माणेकशॉ सेंटर येथील चाणक्य डिफेन्स डायलॉगः यंग लीडर्स फोरम कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ऑपरेशन सिंदूरवेळी पाकिस्तानने माहितीच्या आघाडीवर युद्ध देखील सुरु केले होते. पाकिस्तानने चुकीची आणि खोटी माहिती पसरवण्याचा प्रयत्न केला. त्याला आपण योग्य ते उत्तर दिले. त्यामुळे चुकीच्या आणि खोट्या माहितीपासून सतर्क राहण्यासाठी आणि प्रतिकार करण्यासाठी शैक्षणिक संस्थांसह तरुणांमध्ये डिजिटल साक्षरता अधिक गरजेची आहे, असे आवाहन यावेळी कर्नल सोफिया कुरेशी यांनी केले.

# आधी मतदार याद्या साफ करा, मग निवडणूक घ्या–राज ठाकरे

## मनसे–महाविकास आघाडीच्या सत्य मोर्चात लाखोंची गर्दी

**मुंबई । प्रतिनिधी**

**आजचा मोर्चा हा मतदार यादीमध्ये असणाऱ्या घोळाबाबतचा राग व्यक्त करण्यासाठी तसेच आपली ताकद दाखविण्यासाठीचा आहे. या प्रश्नी देशातील अनेकांनी भाष्य केले आहे. त्यामुळे तोच विषय नव्याने सांगण्यासारखं काहीच नाही. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक घ्यायची घाई का आहे, असा सवाल करत आधी मतदार याद्या साफ करा, मगच निवडणूक घ्या, असे आवाहन राज ठाकरे यांनी मोर्चाला संबोधित करताना केले.**

मतदार याद्यांमधील घोळ आणि पान २ वर





### आजची चळवळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीसारखीच – शरद पवार

मुंबईत महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त मोर्चासाठी लोक आली होती. आजची चळवळही संयुक्त महाराष्ट्र चळवळी सारखीच आहे. मतचोरीचा विषय निवडणूक झाल्यानंतर समोर आला. विशेषतः विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आम्हाला धक्का बसला. आता लोकशाहीचा अधिकार जिवंत ठेवण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे, असे आवाहन यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी केले.

### आज फक्त ठिणगी पेटली, वणवा भडकू शकतो – उद्धव ठाकरे

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, आज मोर्चात सहभागी झालेले हे जागृत देशभक्त मतदार आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईनंतर पहिल्यांदाच सर्व पक्षांचे लोक एकत्र आले आहेत. आज फक्त ठिणगी पेटली आहे; हिचा वणवा भडकू शकतो, असा इशारा शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला. यांची भूक संपत नाही. पक्ष आणि चिन्ह चोरले, वडील चोरायचा प्रयत्न केला. आता मत चोरत आहेत, असा टोला लगावत मतचोरी प्रश्न महाराष्ट्र एकवटलेल्याचा आनंद आहे. मतदार यादीत नाव आहे की नाही तपासा, असे आवाहनही त्यांनी केले. आम्ही एकत्र आलो ते तुमच्यासाठी. दोन भाऊ एकत्र आले म्हणजे आमचे काम झाले, असे नाही. आम्ही एकत्र आलो ते मराठी माणसासाठी आणि हिंदूसाठी. त्यासाठी तुमची साथ हवी आहे. मराठी माणसाने मूठ आवळली आहे. ती तुमच्या टाळक्यात हानतील, असा टोलहा यावेळी उद्धव ठाकरेंनी लगावला.

# स्व.मुंडेंना न्याय द्या म्हणत राष्ट्रीय महामार्ग अडवला



**गेवराई । प्रतिनिधी**

फलटण येथील शासकीय रुग्णालयातील डॉक्टर संपदा मुंडे यांनी प्रशासनाच्या छळाला कंटाळून केलेल्या आत्महत्या नंतर राज्यभर वातावरण पेटलेले असताना, शनिवारी धुळे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील वडगाव ढोके येथ नागरिकांनी स्व.संपदा मुंडे यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या, म्हणत रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामध्ये बैलगाडी, जनावरे देखील रस्त्यावर उभी करण्यात आली होती.

बीड जिल्ह्याची कन्या डॉक्टर संपदा मुंडे यांचा राजकीय आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या जाचामुळे बळी गेला असल्याचे आता सिद्ध होत आहे. याप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी चौकशीसाठी स्वतंत्र एसआयटीची स्थापना केली असून, या प्रकरणातील आरोपी असलेल्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी व स्व. संपदा मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा, या मागणीसाठी शनिवारी धुळे – सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव ढोक तालुका गेवराई या ठिकाणी सर्वपक्षीय, सर्व समाजातील नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन पान २ वर

# पीएसआय बदने, बनकरच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**सातारा । प्रतिनिधी**

फलटणमधील डॉक्टर महिलेच्या आत्महत्या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. याप्रकरणी पोलिस चौकशी करत आहेत, तर दुसरीकडे विरोधक आणि सत्ताधारी यांच्यामध्ये याप्रकरणात आरोप–प्रत्यारोप होताना दिसत आहेत. अशातच फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील संशयित आरोपी पीएसआय गोपाल बदने आणि प्रशांत बनकर या संशयित आरोपींची शनिवारी पोलिस कोठडी संपली आहे. परिणामी त्यांना फलटण न्यायालयात हजर केले असता, त्यांना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पीएसआय गोपाल बदने आणि प्रशांत बनकरला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या दोघांना आता सातारला हलवण्यात येणार आहे, अशीही माहिती समोर आली आहे. फलटण प्रकरणासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. 'फलटण प्रकरणी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक एसआयटी गठित करावी', असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस महासंचालकांना दिले आहेत.

# चौदा वर्षांपुर्वीच कारखान्याचा परवाना रद्द आतापर्यंत धोंडे साहेब झोपले होते का?

## आजवर तुमच्या कारभाराच्या तक्रारी केल्या नाहीत मात्र आता लक्ष घालावे लागेल–आ.धस

**आष्टी प्रतिनिधी**

महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याला सन २०११ मध्ये शेवटचा गाळप परवाना देण्यात आला होता. त्यानंतर शुगर कंट्रोल ऍक्ट १९६६ यामध्ये सुधारणा होऊन सन २००६ मध्ये मनमोहन सिंग पंतप्रधान असताना यूपीए सरकारने कोणताही सहकारी अथवा खासगी साखर कारखाना



पाच वर्षाहून अधिक काळ बंद असेल त्याचे गाळप झालेले नसेल तर नियमाप्रमाणे त्यांचा गाळप परवाना रद्द करण्याचपा नियम काढला त्या नियमानुसार (कडा) महेश सहकारी साखर कारखान्याचा परवाना रद्द झाला आहे. मात्र त्यांनी माझ्यावर आरोप करीत आमदार झाल्यावर परवाना रद्द केल्याचा आरोप केला आहे. गेल्या दहा वर्षांत धोंडे साहेब झोपले होते का? परवाना काढणे एका आमदाराच्या हातात नसते एवढेही त्यांना कळत नाही. तुमच्या कारभारात आजवर लक्ष घातले नाही मात्र आता लक्ष घालावे लागेल, असे जोरदार आणि आक्रमक प्रत्यूत्तर आ.सुरेश धस यांनी माजी आमदार भिमराव धोंडे यांना दिले आहे.

आ.धस यांच्यामुळे (कडा) महेश पान २ वर




# वायुप्रदूषण : २०२२ मध्ये १७ लाख लोकांचा मृत्यू

## लॅन्सेट काऊंटडाऊनचा अहवाल

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारतातील बा वायू प्रदूषणामुळे २०२२ मध्ये सुमारे ३० लाख कोटींचा फटका बसला आहे. हे प्रमाण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ९.५ टक्क्यांच्या बरोबरीचे आहे. 'लॅन्सेट' काऊंटडाऊन या आंतरराष्ट्रीय आणि बहुअनुशासनात्मक संस्थेने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. २०२२ मध्ये वायू प्रदूषणामुळे झालेल्या मृत्यूंची संख्या कोव्हिडमुळे झालेल्या एकूण मृत्यूंपेक्षा खूप जास्त होती.**

१७ लाख लोकांचा मृत्यू : जागतिक आरोग्य संघटनेच्या जवळच्या समन्वयाने काम करणाऱ्या आरोग्य आणि हवामान बदलावरील लॅन्सेट काऊंटडाऊननुसार, २०२२ मध्ये भारतात २.५ या अतिसूक्ष्म कणरूपी प्रदूषकाच्या संपर्कात आल्याने १७ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. दरम्यान, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने मात्र संबंधित मृत्यूंच्या मोठ्या आकड्यांचे खंडन केले आहे. २०२२ मध्ये भारतातील घरांमध्ये प्रदूषणकारी इंधनाच्या वापरामुळे होणाऱ्या वायुप्रदूषणामुळे प्रति एक लाख लोकांमागे ११३ मृत्यू झाले. घरातील वायुप्रदूषणामुळे होणारे मृत्यू दर शहरी भागांपेक्षा ग्रामीण भागात जास्त होते (ग्रामीण भागात पान २ वर



### उष्णतेचा सर्वाधिक त्रास

अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतातील लोकांना सरासरी १९.८ दिवस उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला. यापैकी ६.६ दिवसांचा सामना हवामान बदलाशिवाय अपेक्षित नव्हता. १९९०–१९९९ च्या तुलनेत, २०२४ मध्ये लोकांना सरासरी ३६६ अधिक तास अशा वातावरणीय उष्णतेचा सामना करावा लागला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५५.०० क्विंटल | २,३११ | २,८६० | २,६११ |
| ज्वारी/हायब्रिड :६८.०० क्विंटल | २,२०० | ३,४४० | २,८२७ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १०.५० क्विंटल | ६,८५१ | ६,८५१ | ६,८५१ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,०५२ | २,८०० | २,५३५ |
| मुग:४.५० क्विंटल | ४,९०० | ५,७०१ | ५,३०० |
| सोयाबीन: ९.०० क्विंटल | ४,३०० | ४,३५० | ४,३२५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,००१ | ५,२५० | ५,१२५ |

cmyk

## अग्रलेख

# सरकारने संवेदनशिल व्हावे

शेतकऱ्यांसाठीच्या विविध मागण्यांसाठी सुरू झालेल्या बच्चू कडू यांच्या आंदोलनावर सरकारने समिती स्थापनेचा उपाय शोधला आहे. कडू यांनी अनेक मागण्या केल्या असल्या तरी राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी आणि पावसाच्या जबरदस्त तडाख्याने झालेल्या नुकसानीसाठी शंभर टक्के नुकसान भरपाई या त्यातील दोन प्रमुख मागण्या आहेत. मुख्यमंत्री आणि बच्चू कडू यांच्यात झालेल्या बैठकीनंतर सरकारने नऊ सदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. शेतकऱ्यांची कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी मुक्तता करण्याच्या दृष्टीने समितीने सखोल अभ्यास करून सरकारला उपाययोजना सुचवणे हा त्यामागचा एक मुख्य उद्देश सांगितला जातो. सहा महिन्यांत अहवाल सादर करावा, असा आदेशही सरकारने दिला आहे. त्यामुळे रेल्वे रोकोसारखे आंदोलनाचे पुढचे टप्पे कडू यांनी रद्द केल्याचे जाहीर केले.

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची मागणी आजची नाही., जुनीच आहे. याआधी अनेक नेत्यांनी आणि संघटनांनी ती लावून धरण्याचा प्रयत्न केला आहे. पण यावेळच्या मागणीला निसर्गाने दिलेल्या तडाख्याची पार्श्वभूमी आहे. सुरुवातीला अवकाळी, मग हंगामी आणि नंतर परतीच्या पावसाने होत्याचे नव्हते केले. पुढची किमान दोन-तीन वर्षे अनेक शेतकरी डोके वर काढू शकणार नाहीत. सरकारच्या मदतीशिवाय कर्ज फेडणे अनेकांना शक्य होऊ शकणार नाही. प्रश्न फक्त शेतातील पिकाचा नाही. मातीची प्रचंड धूप झाली आहे. पिण्याच्या पाण्याचे स्रोत प्रभावित झाले आहेत. पशुधन गमावले आहे. हे अनेक जिल्ह्यांमधील वास्तव आहे. उद्ध्वस्त शेतीवर माध्यमांनीदेखील प्रकाश टाकला आहे. अशावेळी शेतकऱ्यांना सरकारकडूनच रास्त अपेक्षा असते. संपूर्ण कर्जमाफीच्या मुद्यावर परस्पर विरोधी मते मांडली जातात. तसे करणे शक्य नाही, असा त्याचा प्रतिवाद केला जातो. तर अनेक बडी धेंडे बँकांचे कर्ज थकवतात. देश सोडून पळून जातात. राजकीय लागेबांधे वापरून दिवाळखोरी जाहीर करतात. वित्तीय संस्था अडचणीत आणतात किंवा डुबवतात असे मुद्दे जोरकसपणे मांडले जातात. बड्या धेंडांनी कर्ज बुडवून संस्था अडचणीत आणायच्या आणि त्या जगवण्यासाठी सरकारने आर्थिक पाठबळ द्यायचे हे अनेक संस्थांचे वास्तव आहे, जे नाकारले जाऊ शकत नाही. अशाच काही धेंडांमुळे अनेक ठिकाण्याच्या जिल्हा बँक अडचणीत आलेल्या आहेत. सरकारला आणि सामान्यांना चुना लावणाऱ्यांचे सरकार काय वाकडे करते, असा प्रश्न माफीचे समर्थक उपस्थित करतात. सामान्य शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या रीतसर मागणीकडे मात्र तेच सरकार जाणूनबुजून दुर्लक्ष करते, असा आरोप करतात. या म्हणण्यात तथ्य आहेच. शेतकरी कर्ज घेतात आणि माफीची वाट बघतात असाही एक आक्षेप नेहमीच घेतला जातो. पण सरसकट सर्वांना त्याच तराजूत तोलणे अन्यायकारकच ठरू शकेल. अनेक शेतकरी नियमित कर्ज फेडतात. अशा शेतकऱ्यांना सरकारसुद्धा प्रोत्साहन देतच असते.

उदाहरणार्थ, महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी निधी मंजूर केला होता. कर्ज नियमित फेडणाऱ्यां शेतकऱ्यांना पन्नास हजार प्रोत्साहनपर लाभ देण्याचे त्यांनी जाहीर केले होते. म्हणजेच, अनेक शेतकरी प्रामाणिकपणे कर्ज फेडतात हे स्पष्ट होते. अर्थात, नियमाला अपवाद सगळीकडेच असतात. पण म्हणून सरसकट शेतकऱ्यांना दोष दिला जाणे सर्वथा अयोग्यच. तेव्हा सामान्य शेतकऱ्यांची कर्जफेडीची इच्छा असली तरी सद्यस्थितीत किती शेतकऱ्यांना ते खरेच शक्य होऊ शकेल? खरोखरच शक्य नाही, हे सरकारदेखील जाणून आहे. त्यामुळे कडू यांच्या मागणीचा सरकार सकारात्मक पद्धतीने विचार करेल ही अपेक्षा. कारण सरकारी समिती नेमण्याच्या निर्णयाची संभावना, तप्त वातावरण शांत करण्यासाठीचा राजकीय वेळखाऊ उपाय अशी केली जाते.

विविध समस्यांवर नेमलेल्या सरकारी समित्यांचे पुढे काय होते? त्या अहवाल सादर करतात का? सरकार तो स्वीकारते का? उपाय अमलात आणले जातात का? हा संशोधनाचा विषय ठरू शकेल. तसे याबाबतीत होऊ नये. राहता राहिला आंदोलनांसाठी स्वीकारलेल्या मार्गाचा मुद्दा. तर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्याची दखल घेतली यातच सगळे आले. पण सरकारवर दबाव आणण्यासाठी आंदोलकांना वारंवार तोच मार्ग का अवलंबावा लागतो? नाक दाबल्याशिवाय तोंड उघडले जात नाही असा सरकारबाबतीचा समज बळावला आहे, याचा विचार सरकारने संवेदनशीलतेने करण्याची खरी गरज आहे.

## परळी नगरपरिषद, जि.प., पं.स.निवडणुका महाविकास आघाडी पूर्ण ताकतीने लढणार आणि जिंकणार-राजेंद्र मस्के



**परळी । प्रतिनिधी**

**होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची परळी शहर व तालुक्याची आढावा बैठक छत्रपती शिवाजी महाराज चौक रेस्ट हाऊस येथे संपन्न झाली या बैठकीला मार्गदर्शक म्हणून जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के होते.**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुक अनुषंगाने परळी मध्ये पक्ष बांधणी तसेच परळी नगर परिषद वार्ड निहाय आढावा, जिल्हा परिषद पंचायत समितीचा गट वाईज आढावा घेण्यात आला. परळी मतदार संघ हे पवार साहेबांच्या विचाराला मानणारा मतदारसंघ असून येणाऱ्या निवडणुका ह्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पूर्ण ताकतीने लढणार असून महाविकास आघाडी व इतर वेगवेगळे घटक पक्ष यांना सोबत घेऊन निवडणूक लढणार या मतदारसंघाच्या विकासासाठी मागच्या काही वर्षांमध्ये शेकडो कोटीचा निधी विकासाच्या नावाखाली आणला पण कुठेही विकास कामे झालेले दिसत नाहीत उलट अन्याय अत्याचार भ्रष्टाचार यामुळे त्रस्त असलेल्या परळीकरांना एक आशेचा किरण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष असून येणाऱ्या निवडणुकीमध्ये नक्कीच या भागातील जनता परिवर्तन करून महाविकास आघाडीला भरघोस मतांनी निवडून देईल असा विश्वास व्यक्त करून कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक बांधणीच्या सूचना याप्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, विधानसभेचे नेते राजेसाहेब देशमुख, युवक नेते राजेभाऊ फड, प्रभाकर वाघमोडे, जिल्हा सरचिटणीस देवराव लुगडे महाराज, बाळासाहेब देशमुख, डॉ यशवंत देशमुख यांचे मार्गदर्शन झाले. बैठकीचे प्रस्ताविक तालुकाध्यक्ष बाबा शिंदे व शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड अर्जुनराव सोळंके यांनी केले तर आभार प्रा अनिल जाधव यांनी मांडले या बैठकीला परळी शहर तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबडमध्ये ६१ वाहनधारकावर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड पोलीस ठाण्याचे पथक व ग्रामीण वाहतूक शाखा जालना यांच्या संयुक्त कारवाईमुळे अंबड शहरात नियमाचेउल्लंघन करणाऱ्या विरुद्ध ६१ मोटरसायकल वाहना विरुद्ध कारवाई करण्यात आली. सदरील कारवाई अंबड शहर व परिसरात करण्यात आली. सदरील ही धडाकेबाज कारवाई १ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आली या कारवाईमुळे वाहनधारकांमध्ये**



**पळवा पळवी बघायला मिळेल. यावेळी फॅन्सी नंबर प्लेट, तुटलेल्या नंबर प्लेट, काळ्या फिल्म / शेड्स तसेच १२ वर्षांवरील जुनी वाहने चालविणारे नागरिक यांच्यासह एकूण ६१ वाहनधारकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.**

या कारवाईत ६३ हजाराचा दंड वसूल करण्यात आला. अशीच कारवाई सातत्याने सुरू राहणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली. नागरिकांनी कारवाई टाळण्यासाठीआपल्या वाहनांवरील फॅन्सी नंबर प्लेट व काळ्या फिल्म तत्काळ काढून टाकाव्यात, तसेच वाहन चालविताना लायसन्स आणि कागदपत्रे जवळ बाळगावीत, असे पोलिसाकडून सूचना करण्यात येत आहे.सदरील ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपविभागीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, अंबड पोलीस ठाणे प्रमुख पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या नेतृत्वात अंबड पोलिसांनी ही कारवाई केली.

## एकता दौडमध्ये धावले अधिकारी, कर्मचारी, व सामाजिक कार्यकर्ते

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यासाठी अंबाजोगाई पोलिस दलाच्या वतीने शुक्रवारी सकाळी रन फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले होते. यातून सामाजिक एकात्मतेचा संदेश देत पोलिस दलातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक, युवती यांचा मोठा सहभाग होता.**

या एकता दौड चे उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या सह अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. या दौडमध्ये स्थानिक नागरिक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, क्रीडा संघ आणि स्वयंसेवी संस्था यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक ठिकाणी दौडनंतर राष्ट्रीय एकतेचा संकल्प घेण्यात आला. उपक्रमाचा मुख्य उद्देश राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक ऐक्य आणि देशभक्तीचा संदेश सर्व स्तरांवर पोहोचवणे, देशातील सर्व घटकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा, सामाजिक सौहार्दाचा आणि भिन्नतेतून एकतेचा संदेश जनमानसात पोहोचवणे हा होता.

### अंबाजोगाईत एकता दौडच्या माध्यमातून पोलिसांकडून सामाजिक एकात्मतेचा संदेश



### एक भारत, श्रेष्ठ भारतचा जयघोष...

अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके म्हणाल्या की , सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताचे एकत्रीकरण करून राष्ट्रीय ऐक्याचा पाया घातला. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजातील प्रत्येक घटकाने देशाच्या एकतेसाठी योगदान द्यावे, हीच खरी त्यांना आदरांजली आहे.यावेळी ''एक भारत-श्रेष्ठ भारत'', ''अखंड भारत-जय भारत'' या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

## पान ६ वरून...

### श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे

पालखी मिरणूक निघणार आहे. पालखी मिरणूक झाल्यावर ५:३० वाजता गुरुवर्य गोरक्षनाथ महाराज यांचा महाअभिषक ह.भ.प.गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते होणार आहे. महाअभिषक झाल्यावर श्री गोरक्षनाथ महाराज यांची महाआरती कार्यक्रम होणार आहे ह.भ.प. गुरुवर्य किसान बाबा महाराज, ह.भ.प. गुरुवर्य साधू बाबा महाराज, श्री दत्त गुरू माऊली यांची आरती कार्यक्रम होणार आहे. महाआरती झाल्यानंतर महाप्रसाद होणार आहे महाप्रसादाचे यजमान श्री दादासाहेब अजिनाथ लांडे सरपंच घाटसावळी, सखाराम राधाकिसन लांडे, महादेव विष्णू लांडे, सुंदर मोतीराम लांडे हे महाप्रसादाचे यजमान आहेत जास्तीत जास्त भाविक भक्तांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या गोरक्षनाथ प्रगटदिन सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प. गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांनी केले आहे.

----------------

### बालकांचे लैंगिक शोषणापासून

व्यक्त करताना म्हणाले की काळजी व संरक्षणाची बालके,विधी संघर्ष ग्रस्त बालके हरवलेली सापडलेली बालके, बाल लैंगिक अत्याचार, बालकामगार बालविवाह अशा बालकांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामुळे या प्रशिक्षणाचा अधिकारी व कर्मचारी यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे असे सांगितले.या प्रशिक्षणामध्ये वसीम शेख यांनी विधी संघर्षग्रस्त बालकांच्या संदर्भातील प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.परम आनंद यांनी काळजी व संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांबाबतच्या प्रक्रिया स्पष्ट केल्या, तर सचिन करंजुळे यांनी कायद्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली.या प्रशिक्षण सत्रामुळे बालकल्याण पोलिस अधिकाऱ्यांना बाल संरक्षणाशी संबंधित कायदेशीर बाबींची सखोल समज प्राप्त झाली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पल्लवी जाधव यांनी केले.

----------------

### माजलगाव शहरातील

पोलीसानी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने चोरट्यांचा मागोवा घेण्याचे प्रयत्न सुरू केला आहे. प्राथमिक तपासात बाहेरच्या एकाच टोळीने ही सर्व चोऱ्या केल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.दरम्यान अज्ञात चोरट्या विरोधात माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

----------------

### कुप्पा गावच्या उपसरपंचपदी

संधी देण्याचे ठरले होते. त्यानुसार रामराव पवार यांनी शब्द पाळत राजीनामा दिला होता. रिक्त जागेवर प्रशासनाने नुकतीच निवडणूक घेतली या निवडणुकीत रत्नमाला सखाराम सावंत यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे स्वागत त्यांचे सुपुत्र सुरेश सावंत यांचा सत्कार करून आमदार प्रकाश दादा सोळंके, युवा नेते जयसिंग भैया सोळंके, पंचायत समितीचे माजी सभापती प्रशांत बापू सावंत, तालुका अध्यक्ष बजरंग साबळे, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर काका सावंत, माजी सरपंच डॉक्टर प्रवीण सावंत, माजी सरपंच सुभाषराव सावंत, चेअरमन दत्तात्रय मायराने, काळे, सरपंच सोनवणे यांच्यासह जिजाबाई रामराव पवार, रोहिदास बळीराम राठोड, अर्जुन मसाजी मुजमुले, संजय भीमराव पवार, कमल प्रल्हाद सोनवणे आदी मान्यवरांनी सत्कार करून सुरेश सावंत यांना शुभेच्छा दिल्या.

----------------

### डॉ.संपदा मुंडे

कार्यकर्ते), डॉ. संजय तांदळे (मातृभूमी प्रतिष्ठान), डॉ. साक्षी ताई जोगदंड,लेक लाडकी अभियान चे बाजीराव ढाकणे, खंडुभाऊ जाधव (वंचित बहुजन आघाडी), रोशन केकान (सामाजिक कार्यकर्ते) आणि इतर मान्यवर उपस्थित होते. निवेदनात असे नमूद करण्यात आले की, डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली नसून, त्यांना दीर्घकाळ चाललेल्या मानसिक छळामुळे आणि काही उच्च पदस्थांच्या दबावामुळे आत्महत्या करावी लागली आहे. त्यामुळे या प्रकरणी गुन्हेगारांवर तात्काळ कलम लावून कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रुपाली चाकणकर यांनी या घटनेबाबत पीडितेच्या चारित्र्यहननासारखी विधाने केली असल्याने त्यांनी आपल्या पदाचा तत्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. निवेदन स्वीकारताना प्रशासनाने गंभीरतेने बाब हाताळण्याचे आश्वासन दिले. तथापि, एस.डि.पी.आय बीड जिल्हा शाखेने इशारा दिला की, जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर बीडमध्ये मोठं आंदोलन उभारण्यात येईल.

## पान १ वरून...

### ऊस दरावरुन कारखानदारांची

यांनी सोमवारी सर्व शेतकरी संघटना, कारखानदार आणि प्रशासनाची बैठक घेऊन यावर मार्ग काढावा, अशी मागणी स्वाभिमानीने केली आहे. गेल्या हंगामात साखर कारखान्यांनी साखरेसह उपपदार्थातून चांगली कमाई केली आहे. यावर्षीसुद्धा साखर, इथेनॉल, मोलॅसिस, बगॅस या उपपदार्थांना चांगला दर मिळत आहे. दुसरीकडे काटामारी आणि रिकव्हरी चोरीतून शेतकऱ्यांची लूट केली जात आहे. या हंगामाच्या सुरुवातीला कारखानदारांकडून गुंडाकरवी संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली जात आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव मिळाला पाहिजे. यासाठी संघटित होऊन लढा द्यावे लागेल, असे शेट्टी यांनी म्हटले आहे.

**आंदोलनाची तयारी करण्याचा आदेश**

राज्याचे मुख्यमंत्री ५ नोंव्हेंबर रोजी कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी भूमिगत होऊन आंदोलनाची तयारी करावी. त्याबरोबरच ७ नोव्हेंबर रोजी निगवे (ता. करवीर) येथून पुढील आंदोलनाची घोषणा करण्यात येणार असल्याचे स्वाभिमानीकडून सांगण्यात आले आहे.

---------

### स्व.मुंडेंना न्याय द्या म्हणत

केले. या आंदोलनात बैलगाड्यासह जनावरे देखील होती. यावेळी करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पोलीस आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने आंदोलन करणाऱ्यांच्या भावना लक्षात घेत त्यांची निवेदन स्वीकारले. यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

------------

### आधी मतदार याद्या साफ करा,

मतचोरीचा निषेध करण्यासाठी शिवसेना उबाठा, मनसे यांच्यासह महाविकास आघाडीमधील मित्रपक्षांनी शनिवारी मुंबईत विराट मोर्चा काढला. सर्व विरोधी पक्षांचे प्रमुख नेते या मोर्चात सहभागी झाले होते. सोबतच राज्यभरातील लाखो नागरिक या मोर्चात सहभागी झाल्याचे दिसून आले. मतदारा यादीतील गोंधळाबाबत सर्वच पक्षाचे लोक बोलत आहेत. सर्व काही लपून चालले आहे, असे सांगत यावेळी राज ठाकरे यांनी भिवंडीमधील मतदाराने मुंबईच्या मलबार हिलच्या मतदार संघात मतदान केल्याचे सांगत मुंबईत लोकसभा मतदार संघातील मतदार यादी १ जुलै २०२५ रोजी बंद का केली, असा सवालही राज ठाकरे यांनी केला. तसेच यावेळी मतदारसंघ निहाय दुबार मतदानांची नोंदच त्यांनी वाचून दाखवले. आम्ही निवडणूक आयोगाला पुरावे दिले तरी हट्ट सुरू आहे. स्थानिक स्वराज संस्था निवडणुका घेण्याची कुणाला घाई झाली आहे. पाच वर्षे निवडणूक घेतली नाही आणखी एक वर्ष निवडणूक लांबणीवर पडल्याने काय फरक पडणार आहे. सत्ताधाऱ्यांना निवडणूक पदरात पाडून घ्यायची आहे, असा आरोपही त्यांनी केला.

**दुबार मतदार आले की बडवायचे**

निवडणूक आयोगाच्या माध्यमातून हे सगळे सुरू आहे. मतदार उन्हातान्हात उभा राहतो त्याचा अपमान नाही का? जेव्हा कधी निवडणूक होतील तेव्हा घराघरात जा. मतदान केंद्रावर बसायचे आणि दुबार मतदार करण्यास कोणी आले की आधी बडवायचे त्यानंतर पोलिसांकडे सोपवायचे, असेही राज ठाकरे यांनी यावेळी म्हटले.

**प्रमुख विरोधी नेत्यांसह नागरिकांचाही सहभाग**

मोर्चामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेसचे वडेट्टीवार, थोरात आणि राज्यातील वरिष्ठ नेते, शेकापचे जयंत पाटील, राष्ट्रवादीच्या खा,सुप्रीया सुळे, डॉ.जितेंद्र आव्हाड तसेच डाव्या पक्षांचे नेते आदी या मोर्चात सहभागी झाले हाते. मुंबईकरांना त्रास होऊ नये यासाठी हा मोर्चा दुपारी ठेवला होता. आंदोलनाची पुढील दिशा काय असेल याची घोषणा दोन दिवसात होणार आहे.

------------

### वायुप्रदूषण : २०२२ मध्ये

प्रति एक लाखमागे १२५ आणि शहरी भागात ९९), असे अहवालात म्हटले आहे.

----------

### चौदा वर्षांपुर्वीच कारखान्याचा परवाना

सहकारी साखर कारखान्याचा परवाना रद्द झाला असा गंभीर आरोप माजी आ.भिमराव धोंडे यांनी केल्यानंतर याबाबत बरीच मोठी चर्चा झाली. यावर संतापलेल्या आ.धस यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेत धोंडे यांनी केलेल्या आरोपाला जोरदार प्रतित्यूर दिले. आ. धस म्हणाले, ०८ एप्रिल २०२४ रोजी केंद्र सरकारचे अप्पर सचिव सुनील सुवर्णकार यांनी याबाबत महेश कारखान्याच्या मालकांना कळवले आहे. कडा सहकारी साखर कारखान्याच्या मूळ सभासदांची वाट लावून भीमराव धोंडे या कारखान्याचे मालक बनलेले आहेत. त्यांनी चुकीच्या सल्ल्यावरून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे १९ कोटी रुपये भरून कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला ही बाब चांगली असल्यामुळे मी त्यांच्या विरोधात कुठेही काही बोललेलो नाही अथवा तक्रार केलेली नाही. परंतु त्यांनी कारखाना परिसरातील काही तिरमली आणि मागासवर्गीय कुटुंबीयांना परिसरातून हाकलून देण्याचा प्रयत्न केला. वास्तविक पाहता त्यांनी १९ कोटी रुपये भरण्याऐवजी साखर आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन घेणे गरजेचे होते. त्यांचे मार्गदर्शक कोण आहेत ते तपासावे आणि त्यानंतर पैसे भरण्याची आवश्यकता होती. गेली १४ वर्षे कारखाना बंद असताना आमदार सुरेश धस यांनी साखर कारखान्याचे लायसन्स रद्द केले असे ते म्हणत आहेत. कोणत्याही आमदाराला कोणत्याही साखर कारखान्याचा परवाना रद्द करण्याचा अधिकार आमदाराला असता तर राज्याला एकही कारखाना सुरू राहिल नसता. तुम्ही चार टर्म आमदार असताना असे विधान करणे म्हणजे हास्यास्पद आहे. केवळ महेश साखर कारखान्याचा परवाना रद्द झाला नसून, महाराष्ट्रातील आणखी १७ सहकारी अथवा खासगी कारखाने आणि १९ कारखाने कर्नाटकातील आहेत. या सर्व कारखान्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भीमराव धोंडे यांनी माझ्या विरुद्ध निवडणूक लढवून ते पराभूत झाले. भारतीय जनता पार्टीच्या विरुद्ध काम केले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि.२९ एप्रिल २०२५ रोजी केंद्र शासनाकडे त्यांना लायसन्स पुन्हा मिळावे यासाठी पत्र दिले. तत्पूर्वी साखर आयुक्तांनी त्यांचा प्रस्ताव नाकारला. दिल्ली येथील वाणिज्य विभागाने प्रस्ताव नाकारला. अखेर भीमराव धोंडे यांनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठांमध्ये दि.१८ ऑगस्ट २०२५ रोजी लबाडी करून सन २०१८, २०१९ मध्ये गाळप परवाना मिळाल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. तरी मी काहीही बोललेलो नाही. मी अंभोरा येथे कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला. जयदत्त ॲग्रो या नावाने मला लायसन मिळाले होते, परंतु मी मुदतीमध्ये कारखान्याचे काम चालू न केल्यामुळे जयदत्त ॲग्रो चे देखील लायसन रद्द झाले. मी पुन्हा प्रयत्न केला परंतु जयदत्त ॲग्रो या नावाने पुन्हा लायसन्स मिळणार नाही, असा कायदा असल्यामुळे मी साईराम या नावाने नवीन नोंदणी करून दोन-तीन वर्ष अथक प्रयत्न केल्यामुळे मला दि.११ मार्च २०२५ रोजी लायसन्स प्राप्त झाले आहे. दोन कारखान्यामधील अंतराचे केंद्र शासनाचे आणि महाराष्ट्र शासनाचे वेगळे नियम आहेत त्यानुसार सर्व तपासण्यापूर्ण होऊन ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर आमच्या कारखान्यास लायसन्स मिळालेले आहे, असे सुरेश धस म्हणाले. आ. धस पुढे म्हणाले, अंभोरा कारखान्याविषयी मी आज बोलणे योग्य होणार नाही मी ते माझ्या कृतीतून योग्य वेळी माहिती देईल. भीमराव धोंडे साहेब यांच्याकडे संस्था आहेत, पैसा आहे, भरपूर कर्मचारी आहेत, यांना घेऊन त्यांनी धरणे आंदोलने करत राहावीत. बीडला झाले, आता पुण्याला जावे, त्यानंतर दिल्लीला जावे, यामध्ये आपल्या भागातील वाहन चालक मालकांचा फायदा होत आहे. आणि अखेर काहीच झाले नाही तर सर्वोच्च न्यायालयात जाऊन त्यांनी परवाना मिळवावे असे सांगत चार टर्म विधानसभा सदस्य राहिलेल्या भीमराव धोंडे यांना शुगर कंट्रोल ॲक्ट बाबत माहिती नसावी ही हास्यास्पद बाब असल्याचे सांगत त्यांना चुकीचे सल्लागार आहेत असे दिसून येत असल्याचे आ. धस म्हणाले. कडा सहकारी साखर कारखाना हा कदम, आजबे, थोरवे, वाळके या घराण्यांनी उभा केला आहे हे खरे आहे. भीमराव धोंडे यांनी हे कबूल केल्यामुळे त्यांचे आभार. परंतु आपण या मूळ सभासदांच्या घरातील एखादा तरी सभासद शिल्लक ठेवला आहे का? भीमराव धोंडे साहेबांनी साखर कारखाना ही संस्था आईप्रमाणे न सांभाळता ती बाईप्रमाणे सांभाळली असून, त्यामुळे संस्था डबघाईला आली. तरुणाईला रोजगार देण्याच्या गोष्टी आपण करत आहात, परंतु कडा कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना आपण काय न्याय दिला. हजारो कामगारांचे जीवन आपण बरबाद केले आहे. अर्धे अधिक कामगार मृत्युमुखी पडले असून, काहींच्या पत्नीने आपली जीवन यात्रा संपवली तरी वारसांना अद्यापही त्यांचे येणे रक्कम मिळालेली नाही. आज काही कामगारांचे वय ७५ वर्षे झाले आहे. त्यांना न्यायालयाने ४५ कोटी देण्यात यावेत असे आदेश आहेत परंतु त्यांना अद्याप काहीही रक्कम देण्यात आलेली नाही. नवीन रोजगार देण्याऐवजी ज्यांचे रोजगार हिरावले आहेत. त्यांचे पैसे अगोदर द्या, असे आवाहन धसांनी केले. कडा कारखान्याकडे बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे २० कोटी रुपये कर्ज बाकी असून, या बँकेच्या ना हरकत प्रमाणपत्र शिवाय कोणीही कर्ज देऊ नये असे पत्र तत्कालीन प्रशासक अविनाश पाठक यांनी दि.२७ मार्च २५ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला दिलेले आहे. महेश मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी हे केंद्र शासनाच्या विभागांतर्गत येते. राज्य शासनाच्या सहकार विभागाचा काहीही संबंध नसताना महेश मल्टीस्टेट बोजा कमी करण्याचे पत्र कसे देऊ शकते हे चुकीचे आहे असे सांगत भीमराव धोंडे यांनी महेश साखर कारखान्याच्या परवान्याबाबत माझा उगिचच संबंध जोडला आहे. माझी बदनामी केली आहे, त्यामुळे यापुढे महेश मल्टीस्टेटचे पैसे कुठे कुठे गुंतवले आहेत. कॅन्सर हॉस्पिटलसाठी किती कर्मचाऱ्यांचे पगार कपात केले आहेत. याची देखील माहिती मला आहे असे सांगत. पुढे बोलताना आ.धस म्हणाले, भीमराव धोंडे हे यापुढे परत भाजपा, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे आणि आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्याकडे जाण्याच्या तयारीत आहेत त्यासाठी त्यांनी एका राजकीय आघाडीची निवडणूक आयोगाकडे नोंदणी करून, कुलूप किल्ली हे चिन्ह घ्यावे. कारण त्यांनी सर्व सहकारी संस्थेला कुलूप लावलेले आहे, असा मिस्कील टोलाही शेवटी आ.धस यांनी लगावला.




दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५


## थोडक्यात...

### कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांसाठी केली बैठक व्यवस्था



दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव पंचायत समितीचे माजी सदस्य सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिंद्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी गेल्या काही महिन्यांपासून दिंद्रुड मध्ये स्वखर्चाने विकास कामांचा धूम धडाका लावला आहे, ३१ ऑक्टोंबर रोजी कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराने स्वखर्चातून येथे नवीनच सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रांगणात रुग्णांना बसण्यासाठी आसन व्यवस्था केली. वाढदिवसानिमित्त आवाजावी खर्च करण्यापेक्षा सामाजिक हिताचे कार्य करणे या मागचा हेतू होता. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे. ग्रामपंचायत सदस्य अतुल चव्हाण, पत्रकार अमोल ठोंबरे, संतोष स्वामी,नागेश वकरे,गणेश काटकर,बाबासाहेब देशमाने,नागेश कानडे,किशोर ठोंबरे, राजेश स्वामी यांची यावेळी उपस्थिती होती.



### तलवाडा पोलिसांनी अवघ्या वीस तासांतच अपहरण झालेल्या व्यक्तीची केली सुटका

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील राजापूर येथील रहिवासी असलेले किशोर कांतीलाल गर्जे वय वर्षे २५ हे कामानिमित्त तलवाडा येथे आला होता तलवाडा येथील तुकाई क्लिनिक येथे समोर उभा होता दिं. २८/ १० /२०२५ रोजी सकाळी ११ वाजता एका निळ्या रंगाची चार चाकी वाहन तिथे आले व त्यांनी किशोर कांतीलाल गर्जे याला गाडी टाकून अपहरण केले असल्याची घटना घडली होती या घटनेची माहिति किशोर गर्जे यांचे वडील कांतिलाल मारोती गर्जे यांनी तात्काळ तलवाडा पोलीस स्टेशन येथे धाव घेतली व सर्व हकीकत पोलिसांना सांगितली त्यांच्या विरोधात तलवाडा पोलीस ठाण्यात अपहरण चा गुन्हा फिर्यादी कांतीलाल मारुती गर्जे यांचे फिर्यादीवरून दाखल करण्यात आला होता पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, यांच्या मार्गदर्शनाखाली तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर, यांनी अपहरण झालेले व्यक्तीची गंभीरता घेत तात्काळ तपास करण्यासाठी एक पथक नेमले पथक प्रमुख उपनिरीक्षक कैलास अन्नादास, पोह शेख मोहसीन,पोह हनुमान जावळे, पोह नारायण काकडे, पोह कैशव गोरे, महिला कॉन्स्टेबल प्रियंका यादव, यांनी तपासाचे चक्र अवघ्या वीस तासांतच फिरवले व किशोर गर्जे हे पुणे जिल्ह्यातील आळंदी परिसरातील एका मंदिराचे शेजारी असल्याची गोपनीय माहिती मिळाली व तपास करून त्यांनी किशोर गर्जे ची सुटका केली. किशोर गर्जे यांना तलवाडा पोलीस स्टेशन येथे हजर करून त्यांच्या कुटुंबाच्या स्वाधीन सुखरूप केले आहे. हि कामगिरी उपनिरीक्षक कैलास अन्नादास, पोह शेख मोहसीन, पोह हनुमान जावळे, पोह नारायण काकडे, पोह कैशव गोरे, महिला कॉन्स्टेबल प्रियंका यादव, यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.तलवाडा पोलिसांची कामगिरी म्हणजे या अगोदर दोन अपहरण झालेल्या व्यक्तीची २४ तासात त्यांनी सुटका केली होती तलवाडा पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचारी यांनी चांगले प्रकारे एक काम करत असल्याचे सर्वसामान्य जनतेतून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे, पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहेत.

# हैदराबादहून उड्डाण करणाऱ्या वैज्ञानिक बलूनचा प्रवास अहिल्यानगर जिल्ह्यातही

## प्रशासनाने दिली खबरदारीची सूचना



**पाटोदा । प्रतिनिधी**

हैदराबाद येथील टाटा मूलभूत संशोधन संस्था यांच्यावतीने ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत वैज्ञानिक संशोधनासाठी हवेतील बलून उड्डाणे करण्यात येणार आहेत. या बलूनपैकी काही बलूनची उपकरणे अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागात पडण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. या उड्डाणांना भारत सरकारच्या परमाणु ऊर्जा विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था () यांचे सहकार्य लाभले आहे.

ही बलून उड्डाणे हैदराबाद येथील ईसीआयएल परिसरातून केली जाणार असून, एकूण दहा बलून आकाशात झेपावतील. या बलूनचा व्यास ५० ते ८५ मीटर असून ते हायड्रोजन वायूने भरलेले असतील. उड्डाणे रात्री ८ ते सकाळी ६.३० या वेळेत होतील.

या बलूनमध्ये बसवलेली वैज्ञानिक उपकरणे सुमारे ३० ते ४२ किलोमीटर उंचीपर्यंत जातील आणि काही तास संशोधन करून पॅराशूटच्या साहाय्याने जमिनीवर उतरतील. वाऱ्याच्या दिशेनुसार ही उपकरणे २०० ते ३५० किलोमीटर अंतरावर येऊ शकतात. त्यामुळे ती महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांतील भागांमध्ये उतरू शकतात.

महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, सांगली, सातारा, अहिल्यानगर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, जळगाव आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये उपकरणे पडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सूचना दिल्या आहेत. ज्या ठिकाणी ही उपकरणे सापडतील, ती हलवू नयेत, उघडू नयेत किंवा छेडछाड करू नये. त्या पॅकेजवर दिलेल्या पत्त्यावर त्वरित माहिती द्यावी तसेच जवळच्या पोलीस ठाण्याला व प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. उपकरणे सुरक्षित असली तरी त्यामध्ये संवेदनशील वैज्ञानिक साधने असल्याने छेडछाड झाल्यास माहिती नष्ट होऊ शकते. संशोधन संस्था अशा उपकरणांची माहिती दिलेल्या नागरिकांना योग्य बक्षीस आणि खर्चाची भरपाई देणार आहे. या प्रयोगांविषयीची माहिती गावपातळीपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. पहिले बलून उड्डाण ऑक्टोबरच्या चौथ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

# अहिल्या नगरला दलित अत्याचारग्रस्त जिल्हा म्हणून घोषित करा

## आझाद क्रांती सेनेची निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्या मार्फत गृहमंत्र्यांकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

पुरोगामी महाराष्ट्रात दिवसेंदिवस दलित, मुस्लिम,इतर घटकावर अन्याय अत्याचार वाढत असून,याला सर्वस्वी जबाबदार गृहखाते असून वेळीच समाजकंटकांच्या मुसक्या आवळल्या तर होणारे अत्याचार थांबतील, अहिल्या नगर येथील दलित तरुणाला जातीय द्वेष्यातून हाल हाल करुन मारुन त्याच्या पायावरुन गाडी घालून पाय निकामी करून उलट

गावातीलच काही समाज कंटकांनी भव्य मोर्चा काढून जाहीर सभेत अश्लील भाषेत दलित समाजातील आंबेडकरवादी नेत्यांना खालच्या भाषेत शिवीगाळ करुन,तेथील वैरगर नमक दलित मुलाला जीवे मारण्याची भाषा काही मनुवादी लोकांनी भाषणातून केली असून,मोर्चाचे आयोजक व अश्लील भाषेत धमकी वजा भाषण करणाऱ्या



जातीयवादी गावागुंडाना अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्या नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच असे वारंवार समजावर होणारे अत्याचार तात्काळ थांबवण्यात यावेत.

या जातीय द्वेष भावनेतून कृत्य करणाऱ्या लोकांमुळे समाजात जातीय विष फोफवात आहे. वेळीच या जातीय शत्रूला संपवणे गरजेचं आहे. राज्याचे ग्रहमंत्र्यांनी लवकरात लवकर ही जातीय मानसिकता ठेसून काढावी.

सोनई हे गाव हमेशा दलितांवर अन्याय करणारे असून पोलीस प्रशासनाने अशोभनीय भाषा वापरणाऱ्यावर कठोर शासन करून अटक करावी व अहिल्या नगर जिल्ह्यातील कायदा सुवेवस्था सुरळीत करुन मनू प्रवृतीच्या लोकांना कायद्याचा काय धाक असतो तो दाखवण्यात यावा. जर वरचेवर दलित व इतर समाजावर अन्याय झाला तर आझाद क्रांती सेना सेनाप्रमुख राजेश घोडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यात तीव्र आंदोलने उभे करुत अशा अश्याचे निवेदन माजलगाव चे तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांना देताना आझाद क्रांती सेना तालुका प्रमुख माजलगाव अशोक ढगे,महिला तालुकाहप्रमुख मीना वारभंग, ऊसतोड तालुका प्रमुख तुकाराम जाधव,सचिव किसन भिसे,शहर प्रमुख अकबर शेख, तुकाराम शिंदे, गणेश कांबळे, प्रदीप साळवे, रौफ शेख,लखन आलात,कैलास गायकवाड,संजय लांडगे,विशाल जाधव,इंद्रजित जाधव,अरुण पिसुळे,राजेभाऊ भिसे,जालिंदर पिसुळे (मुंबई ) भाऊसाहेब कापसे, विकास जाधव, पांडुरंग आलात,रहीम पठाण,अजाम कुरेशी,जावेद पठाण,यांनी निदर्शने करून निवेदन दिले.

# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने हसीन अख्तर यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर बीड येथील उर्दू साहित्याचे अभ्यासक सय्यद हसीन अख्तर यांची कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी त्यांचा सत्कार केला. राज्य शासनाने हसीन अख्तर यांच्या कार्याची दखल घेत केलेली नियुक्ती ही बीड जिल्ह्यासाठी आणि अल्पसंख्यांक समाजासाठी गौरवाची बाब असल्याचे सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे. हसीन अख्तर यांनी उर्दू भाषेच्या विकासासाठी मोठे प्रयत्न केलेले आहेत. उर्दू भाषेसाठी त्यांनी दिलेले योगदान महत्वाचे असून त्याचीच दखल घेत राज्य सरकारने त्यांच्यावर कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे. या पदाच्या माध्यमातून ते यापुढे अधिक वेगाने उर्दू भाषेचा विकास , प्रसार आणि प्रचार करून कार्याची व्याप्ती वाढवतील अशी अपेक्षा भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी व्यक्त केली. यावेळी नूर लाला खान, सरफराज शेख, रफिक कुरेशी, आमु आतार, अमजद सय्यद, आमेर शेख आदींची उपस्थिती होती.

# आष्टी-रायमोह बससेवा सुरू करण्याची ग्रामस्थांची मागणी

**शिरूरकासार । प्रतिनिधी**

तालुक्यातील आष्टीडोंगर किन्हीरायमोह हा मार्ग अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात खराब झाला असून येवलवाडी येथील पुल वाहून गेल्याने या मार्गावरील एस.टी. बससेवा गेल्या काही महिन्यांपासून ठप्प आहे. परिणामी ग्रामीण भागातील प्रवाशांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागत आहे. दररोज शाळा, महाविद्यालय, बाजारपेठ व दवाखान्यासाठी जाणाऱ्या नागरिकांना पर्यायी साधनांचा वापर करावा लागत असून अतिरिक्त खर्चाचा भार सोसावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ही बससेवा आष्टीडोंगर किन्हीगारमाथारायमोह या मार्गावरून तातडीने पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रवाशांकडून जोर धरू लागली आहे.

अनेक वर्षांपासून सुरू असलेली आष्टीडोंगर किन्हीयेवलवाडीरायमोह ही बससेवा ग्रामीण भागासाठी जीवनवाहिनी ठरली होती. शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच महिलांसाठी ही बस महत्त्वाचे वाहतूक साधन होते. मात्र, अतिवृष्टीदरम्यान पुल तुटल्याने एस.टी. महामंडळाने बससेवा केवळ डोंगर किन्हीपर्यंतच मर्यादित केली आहे. त्यामुळे रायमोह व परिसरातील प्रवाशांना ८ ते १० किलोमीटरचा प्रवास खाजगी वाहनांद्वारे करावा लागत आहे. स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले की, गारमाथा मार्गे बससेवा वळवून रायमोहपर्यंत चालविणे पूर्णतः शक्य आहे. तरीदेखील संबंधित वाहकाला गाडी रायमोहपर्यंत नेण्याचे आदेश असतानाही ती सेवा सुरू होत नाही, याबाबत प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. याबाबत योग्य चौकशी करून गाडी पुर्ववत सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ही मागणी जिल्हा परिवहन अधिकाऱ्यांकडे सुद्धा पोहोचविण्यात आली असून लवकरच या प्रश्नावर सकारात्मक तोडगा निघेल, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

चौथमाळ आगार व्यवस्थापक, आष्टी यांनी सांगितले की

''संबंधित वाहकाला ही गाडी रायमोहपर्यंत नेण्याचे आदेश असतानाही ती जात नाही. याची चौकशी करून गाडी पुर्ववत सुरू करण्यात येईल.

# दिंद्रुड पंचायत समिती गणासाठी उमरीकरांना मिळणार संधी

## वैजनाथ घायतिडक यांची पं.स.गणाच्या उमेदवारीची मागणी

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड जिल्हा परिषद गट हा यावेळी सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाला आहे. तसेच दिंद्रुड पंचायत समिती गण हाही



सर्वसाधारण महिलेसाठी सुटला असून, यामुळे या भागात नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पूर्वी वारंवार या गणात दिंद्रुड येथील उमेदवारांना प्राधान्य मिळत आले असले तरी, यावेळी उमरी येथील सौ.वर्षा वैजनाथ घायतिडक या प्रबळ दावेदार ठरत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

उमरी गाव हे या गणातील सर्वाधिक मतदार असलेले गाव असून, सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या वैजनाथ घायतिडक यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. त्यांनी काही काळ ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्य करताना गावातील विविध समस्या सोडवण्याचे काम केले आहे.पंचायत समिती गणातील अनेक गावांमध्ये जाऊन त्यांनी सामान्य मतदारांच्या अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे, निराधार लोकांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात त्यांचा सहभाग राहिला आहे.यामुळेच यावेळी दिंद्रुड पंचायत समिती गणासाठी सौ. वर्षा वैजनाथ घायतिडक या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रबळ दावेदार म्हणून चर्चेत आहेत. त्यांनी आ.प्रकाश सोळंके व लोकनेते सुंदरराव सोळंके साखर कारखाना व्हॉ. चेअरमन जयसिंग सोळंके यांच्यासह पक्षाकडे अधिकृत उमेदवारीसाठी मागणी केली असून, स्थानिक पातळीवर त्यांना मोठा जनाधार मिळत असल्याचे बोलले जाते.

# राज्यसेवा परीक्षेत यश मिळवणाऱ्या प्रकाश बडे यांचा आमदार सुरेश धस यांच्या हस्ते गौरव

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील मौजे सोने सावरगाव (सोने) येथील श्री. प्रकाशकुमार महादेव बडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षा २०२५ मध्ये प्रवर्गातून ५९९ गुण मिळवत राज्यात १४वा क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पाटोदा तालुक्याचे नाव राज्यात अभिमानाने झळकले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल प्रकाश बडे यांचा आ. सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते विशेष गौरव सन्मान करण्यात आला. शनिवारी आयोजित समारंभात आमदार धस यांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव केला. या वेळी जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे, भाजपा तालुकाध्यक्ष भागवत येवले राहुल नागरगोजे, सहशिक्षक बडे, अंगद सांगळे, संदीप



जाधव यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सत्कार सोहळ्यात बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले,''पाटोदा तालुक्यातील ग्रामीण पार्श्वभूमीवरूनही युवक मोठ्या ध्येयाने आणि परिश्रमाने राज्यसेवा सारख्या अवघड परीक्षेत यश संपादन करत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. प्रकाश बडे यांनी दाखवून दिले की इच्छाशक्ती आणि मेहनत असेल तर कुठलेही लक्ष्य अशक्य नाही. अशा विद्यार्थ्यांनी आजच्या युवकांसाठी प्रेरणास्थान व्हावे.''प्रकाश बडे यांच्या कर्तृत्वाचा अभिमान व्यक्त करत आमदार धस यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि ''पाटोदा तालुक्यातील युवकांनीही यापासून प्रेरणा घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये उतरावे'' असे आवाहन केले.

# शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या बळावरच जय भवानीची प्रगती होत आहे -अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

कारखान्यासारख्या संस्थेच्या हितासाठी सवंग लोकप्रियतेकडे दुर्लक्ष करून काही कठोर निर्णय केले, प्रसंगी अनेकांची नाराजी स्विकारली परंतु कधीच तत्वाशी तडजोड केली नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्यात यश आले. शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या बळावरच जय भवानीची प्रगती होत आहे. कारखाना पन्नासाव्या वर्षात पदार्पण करत असताना गाळप क्षमता वाढविताना तांत्रिकदृष्ट्या कारखाना सक्षम करण्यात आपण यशस्वी झालो आहोत. या हंगामात नऊ लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट असून कार्यक्षेत्रातील नोंदणी केलेल्या ऊसाचे संपूर्ण गाळप होईपर्यंत कारखान्याचा पट्टा पडणार नाही असे प्रतिपादन जय भवानीचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. नारायणगडचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष




शिवाजीराव (दादा) पंडित यांसह मान्यवरांच्या शुभहस्ते जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर रोजी जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाला. श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.महंत शिवाजी महाराज, कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, चेअरमन अमरसिंह पंडित, व्हा.चेअरमन भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांच्यासह जय भवानीचे आजी-माजी संचालक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प. शिवाजी महाराज आणि जय भवानीचे ज्येष्ठ संचालक राजेंद्र वारंगे यांच्या शुभहस्ते विधीवत गव्हाण पूजन करण्यात आले.

यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक जगन्नाथ शिंदे, कुमारराव ढाकणे, सुनिल पाटील, श्रीराम आरगडे, अप्पासाहेब गव्हाणे, नारायणराव नवले, संभाजी पवळ, गणपत नाटकर, संदिपान दातखीळ, जगन्नाथ दिवान, शरद चव्हाण, भिमराव मोरे, रावसाहेब देशमुख, बाबुराव काकडे, रहेमतुल्ला पठाण, शंकरबप्पा तौर, साहेबराव चव्हाण, डॉ.विजयकुमार घाडगे, माजी उपसभापती विकास सानप, बिपीन डरफे यांच्यासह कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप व सर्व अधिकारी कर्मचारी, कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, ऊसतोडणी वाहतुक ठेकेदार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# शासनाने सोयाबीनला ७ हजार तर कापसाला ९ हजार रुपये हमीभाव द्यावा - नईम आतार यांची मागणी

पात्रुड । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी सध्या महागाईच्या तडाख्यात सापडला असून, अतिवृष्टी मुळे त्याचे कंबरडे मोडले आहे. वाढता उत्पादन खर्च आणि घटलेले बाजारभाव यामुळे शेतीतून जगणे अवघड झाले आहे. खतं, औषधं, मजुरी, आणि सिंचन या सर्व खर्चांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे बीड जिल्हा सरचिटणीस नईम आतार यांनी शासनाकडे ठोस मागणी केली आहे की, सोयाबीनला प्रती क्विंटल ७००० रुपये आणि कापसाला प्रती क्विंटल ९००० रुपये हमीभाव जाहीर करण्यात यावा.

नईम आतार यांनी म्हटले की, आज शेतकरी दिवसरात्र परिश्रम करून धान्य तयार करतो, पण बाजारात त्याच्या उत्पादनाला भाव मिळत नाही. कापूस आणि सोयाबीन ही बीड जिल्ह्यातील प्रमुख पिकं असून, हजारो शेतकरी या पिकांवर आपलं उदरनिर्वाह अवलंबून ठेवतात. पण आज त्यांना मजुरांचा, औषधांचा, आणि इंधनाचा खर्चही भागवता येत नाही. शासनाने जर तात्काळ योग्य हमीभाव दिला नाही, तर शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणखीनच बिकट होईल.

त्यांनी पुढे सांगितले की, कापूस वेचणीसाठी सध्या प्रती क्विंटल सुमारे १००० रुपये खर्च येतो. त्यात वेचणाऱ्या मजुरांना मजुरी, वाहतूक खर्च, तसेच प्रक्रियेसाठी लागणारे अतिरिक्त खर्च धरले, तर शेतकऱ्याच्या हाती फारच थोडा नफा उरतो. दुसरीकडे, सोयाबीन काढणीसाठी २ ते ३ हजार रुपये खर्च येतो, कारण त्यात मशीनरी, कामगार आणि वाहतूक या सर्वांचा मोठा भाग असतो. सध्या बाजारात सोयाबीनला केवळ ४५०० ते ५२०० रुपये भाव मिळतो, तर कापसाला ६५०० ते ७२०० रुपयेपर्यंत भाव आहे. या भावात शेतकऱ्याचा उत्पादन खर्चसुद्धा निघत नाही.आतार यांनी शासनाच्या विद्यमान धोरणावर टीका करताना म्हटले की, शेती हा आपल्या देशाचा कणा आहे, पण शासनाकडून शेतीकडे दुर्लक्ष होत आहे. शेतकरी आत्महत्या करतोय, त्याची कारणं म्हणजे अपुरे भाव आणि वाढती कर्जबाजारीपण. शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांनी नाही तर प्रत्यक्षात दिलासा देणाऱ्या धोरणांची गरज आहे. म्हणून आम्ही शासनाकडे ठाम मागणी करतो की, सोयाबीनला ७००० आणि कापसाला ९००० रुपये हमीभाव जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा. त्यांनी हेही सांगितले की, शेतकऱ्यांना योग्य दर मिळाला, तर ग्रामीण भागात पैसा फिरू लागेल, मजूर वर्गालाही रोजगार मिळेल, आणि स्थानिक बाजारपेठा सशक्त होतील. त्यामुळे हा निर्णय केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर एकूण ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठीही फायदेशीर ठरेल.

# कोल्हापुरात अनेक ठिकाणी ऊसतोडणी रोखण्याचे प्रयत्न

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यात अजूनही ऊस तोडी पूर्ण क्षमतेने सुरू झाल्या नाहीत. मंत्री समितीच्या निर्णयानुसार अधिकृत ऊस गळीत हंगाम शनिवार (दि.१) पासून सुरू झाला आहे. अनेक कारखान्यांनी ३४०० ते ३४५० रुपयांपर्यंत दर जाहीर केले आहेत. या पार्श्वभूमीवर सध्या विविध शेतकरी संघटनांकडून आंदोलन सुरू आहे. ३७५० ते ४००० रुपयांच्या मागणीसाठी अनेक ठिकाणी ऊसतोडणी रोखण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

कोल्हापूर- गगनबावडा मार्गावर कोपार्डे येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रात्री आंदोलन करत दालमिया व डी. वाय. पाटील साखर कारखान्याचे ऊस वाहतूक करणारे सात ट्रॅक्टर रोखून धरले. या वेळी काही प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाली.

दालमिया कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी येऊन ऊसतोडी थांबवितो व दर जाहीर करू, असे आश्वासन दिल्यानंतर ट्रॅक्टर सोडण्यात आले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने राजू शेट्टी यांनी ३७५१ रुपये एक रकमी एफआरपी जाहीर केल्यानंतरच ऊसतोडी सुरू कराव्यात, अशा सूचना दिल्या आहेत. दालमिया साखर कारखान्याने ऊसतोडी सुरू केल्याने त्यांचे पाच ट्रॅक्टर येथे



अडवून धरण्यात आले. डी. वाय. पाटील साखर कारखान्याचीही ऊस वाहतूक रोखून धरण्यात आली. शिरोळ परिसरात शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन आंदोलन अंकुशच्या कार्यकर्त्यांनी ऊस तोडी बंद पाडल्या. हंगाम सुरू होत असला तरी अजूनही प्रशासनाने तातडीने बैठक घेण्याबाबत कोणत्याही हालचाली सुरू केल्या नसल्याचे चित्र आहे. ऊसदर ३५५१ रुपये प्रति टन दर जाहीर न केल्यास ऊसतोड होऊ न देण्याचा इशारा संघटनांचे प्रतिनिधी आणि शेतकऱ्यांनी दिला. अहिल्यानगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऊसदर व अन्य प्रश्नांबाबत प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाच्या पुढाकाराने बैठक झाली. अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयातील अधिकारी, शेतकरी संघटना आणि जिल्हाभरातील साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी रावसाहेब लवांडे, बाळासाहेब फटांगडे, रमेश कचरे, आरले, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी बैठकीत प्रश्न उपस्थित केले.

**अधिकारी झाले निरूत्तर...**

ऊस गाळप हंगाम सुरू झाला असताना बहुतांश कारखान्यांनी दर जाहीर केले नाहीत. दर जाहीर कधी करणार, ऊसाचा काटा मारण्याचा प्रकार कधी थांबणार? शेतकऱ्यांच्या उसाच्या दरातून कर्जवसुली थांबवणार का? कायद्यानुसार ऊस घातल्यानंतर चौदा दिवसांत पैसे देणार का? ज्या कारखान्यांनी पैसे थकवले त्यांच्याकडून व्याजासह वसुली करणार का? अशा अनेक प्रश्नांचा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि शेतकऱ्यांनी भडिमार केला. यातील बहुतांश प्रश्नांवर प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाचे अधिकारी निरुत्तर झाले.




### महत्वाच्या घटना

१९१४ : रशियाने ओट्टोमान साम्राज्याविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४० : दुसरे महायुद्ध ग्रीस व ईटली यांच्यात युद्ध सुरू झाले.
१९५३ : पाकिस्तानातील असेंब्लीने देशाचे नाव इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तान हे ठवले.
१९३६ : कॅनेडियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनची स्थापना झाली.
१९३६ : ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनने बीबीसी टेलिव्हिजन सेवा सुरू केली.
१९९९ : दाक्षिणात्य पार्श्वगायक एस. पी. बालसुब्रम्हण्यम यांची मध्यप्रदेश सरकारतर्फे दिल्या जाणार्या लता मंगेशकर पुरस्कारासाठी निवड. सुगम संगीतातील असाधारण कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७० : एडवर्ड (पाचवा) - इंग्लंडचा राजा (मृत्यू: १४८३?)
१७५५ : मेरी आंत्वानेत - फ्रेन्च सम्राज्ञी (मृत्यू: १६ आक्टोबर १७९३)
१८३३ : महेन्द्र लाल सरकार - होमिओपॅथ, समाजसुधारक व विज्ञानप्रसारक, 'इंडियन असोसिएशन ऑफ कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' या संस्थेचे सहसंस्थापक, होमिओपाथीच्या प्रसारासाठी त्यांनी १८६८ मधे 'जर्नल ऑफ मेडिसीन' हे मासिक सुरू केले. (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९०४ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८८२ : डॉ. के. बी. लेले - महाराष्ट्रातील जादूगारांचे आचार्य (मृत्यू: २ मे १९६३)
१८८६ : धीरेंद्रनाथ दत्ता - बांगलादेशी राजकारणी (मृत्यू: २९ मार्च १९७१)
१८९७ : सोहराब मेहेरबानजी मोदी - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते, दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित (१९७९), 'मिनर्व्हा मुव्हीटोन'तर्फे त्यांनी चाळीसहून अधिक चित्रपट निर्माण केले. (मृत्यू: २८ जानेवारी १९८४)
१९२१ : रघूवीर दाते - ध्वनीमुद्रणतज्ञ, हिन्दी, मराठी, गुजराती आणि उडिया भाषांतील सुमारे चाळीस चित्रपटांचे ध्वनीमुद्रण त्यांनी केले. (मृत्यू: ? ? ????)
१९२९ : बोस कॉर्पोरेशन चे संस्थापक अमर बोस यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै २०१३)
१९४१ : अरुण शौरी - राजकारणी, व पत्रकार
१९६० : अनु मलिक - संगीतकार
१९६५ : शाहरुख खान - अभिनेता व निर्माता.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८५ : बळवंत पांडुरंग तथा 'अण्णासाहेब' किर्लोस्कर - नाटककार (जन्म: ३१ मार्च १८४३)
१९५० : जॉर्ज बर्नार्ड शॉ - नोबेल पारितोषिक विजेते आयरिश लेखक आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे सहसंस्थापक (जन्म: २६ जुलै १८५६)
१९५४ : ग्रीक साहित्याचे व तत्वज्ञानाचे अभ्यासक, संपादक प्रा.गोपाळ विष्णु तुळपुळे यांचे निधन.
१९८४ : शरद्चंद्र मुक्तिबोध - मराठी साहित्यिक
१९९० : भालचंद्र दिगंबर तथा आबासाहेब गरवारे - प्लॅस्टिक व नायलॉन उद्योगाचे जनक, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील एक प्रमुख शिल्पकार, पद्मभूषण, डि. लिट. (पुणे विद्यापीठ), उद्योजक (जन्म: २१ डिसेंबर १९०३)
२०१२ : येरेन नायडू - तेलगु देसम पक्षाचे लोकसभेतील नेते (जन्म: १९५७)
२०१२ : भारतीय-अमेरिकन गणितज्ञ आणि शैक्षणिक श्रीराम शंकर अभ्यंकर यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १९३०).

## रब्बी हंगामातील सहा पिकांसाठी विमा अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु

पुणे : २०२५-२६ पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात खरीप २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ करीता पीक विमा योजना राबविली जात आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायती), हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमुग व रब्बी कांदा (६ पिके) या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित महसूल मंडळ/क्षेत्रात शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल. सदर योजनेतील सहभाग हा कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) करिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५. गहु (बागायत), हरभरा, रब्बी कांदा या पिकाकरिता दिनांक १५ डिसेंबर, २०२५. उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग या पिकाकरिता दिनांक ३१ मार्च, २०२६ अशा तारखा निश्चित केल्या आहेत. त्यासाठीचे पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकमार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरुन देणे आवश्यक आहे. जर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसेल तर तसे त्यांनी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

जे शेतकरी स्वतःच्या स्वाक्षरीसह योजनेत सहभागी न होणेबाबत घोषणापत्र देणार नाहीत त्या सर्व शेतकऱ्यांचा योजनेमध्ये सहभाग बंधनकारक समजला जाईल. यासाठी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या पोर्टलवर स्वतःही शेतकरी नोंदणी करू शकतात. अथवा बँक, विमा कंपनीने नियुक्त केलेले एजंट, क्रॉप इन्शुरन्स ॲप व सामुहिक सेवा केंद्र यांचे मार्फत योजनेतील सहभागाची नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी तात्काळ आपल्या संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसिलदार/तालुका कृषि अधिकारी, जिल्हाधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाशी यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वेळापत्रकानुसार करा जनावरांचे लसीकरण

लसीकरण करण्यापूर्वी जनावराचे आरोग्य तपासणी करावी. आजारी, अशक्त किंवा ताप असलेल्या जनावरांना लस देऊ नये. योग्य वयाच्या जनावरास योग्य वेळी लसीकरण करणे आवश्यक आहे. जनावरांना योग्य काळात लसीकरण केल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढवते.आजाराला प्रतिबंध घातला जातो. प्राणीजन्य आजार म्हणजेच जनावरांपासून माणसांना होणारे आजार जसे की रेबीज, क्षयरोग, स्वाइन फ्ल्यू, ब्रुसेलोसिस यांना आळा बसतो.जनावरांची उत्पादन क्षमता वाढते रोगाचा प्रसार थांबतो. सार्वजनिक आरोग्य अबाधित राहते.



पावसाळ्यानंतरचे लसीकरण : घटसर्प आणि फऱ्या रोगाचे लसीकरण पावसाळ्याआधी किंवा त्यानंतर (ऑगस्ट-सप्टेंबर) मध्ये दरवर्षी एकदाच केले जाते. लाळ्या खुरकूतचे लसीकरण सप्टेंबर ते ऑक्टोबर या दरम्यान करावे. दर ६ महिन्यांनी,म्हणजेच २ वेळा लसीकरण करावे. तरच रोगाचा प्रतिबंध होऊ शकतो. गोवंश, म्हशी, शेळ्या, मेंढ्यांना लसीकरण केले जाते.

पीपीआर (शेळी प्लेग) हा शेळ्या, मेंढ्यांना होणारा विषाणूजन्य आजार आहे.याचे लसीकरण सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान केले जाते. दर ३ वर्षांनी एकदाच लसीकरण करावे. ब्रुसेलोसीसचे लसीकरण फक्त मादी वासरांसाठी ४ ते ८ महिने वयाच्या काळात पावसाळ्यानंतर करावे. रेबीज नियंत्रणासाठी श्वान, मांजरांना पावसाळ्यानंतर दरवर्षी एकदा लसीकरण करावे.

लसीकरणावेळी घ्यावयाची काळजी : लसीकरणापूर्वी जनावराचे आरोग्य तपासावे. आजारी, अशक्त किंवा ताप असलेल्या जनावरांना लस देऊ नये. योग्य वयाच्या जनावरास योग्य वेळी लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरणाच्या वेळापत्रकाचे पालन करावे. त्या भागातील रोगस्थिती व नोंदणीकृत पशुवैद्यकांचे मार्गदर्शन, योग्य लसीचा वापर करावा. लस योग्य तापमानात साठवाव्यात. लस उष्णतेस संवेदनशील असल्याने त्या नेहमी थंड ठेवाव्यात. लसीकरणाची तारीख व लसीचे नाव याची नोंद ठेवावी. लसीकरणाच्या दिवशी आणि त्यानंतर जनावरांना चांगला व संतुलित आहार व स्वच्छ पाणी द्यावे. जास्त श्रम किंवा लांब प्रवास टाळावा.

लसीकरणाबाबत महत्वाची माहिती : लसीकरणामुळे रोगाची प्रतिबंधक क्षमता वाढते. कधीकधी सौम्य ताप किंवा सूज दिसू शकते, पण ती तात्पुरती असते. एकदा लस दिली की आयुष्यभर रोग होत नाही बहुतेक लसीचा परिणाम ठरावीक कालावधीपर्यंतच राहतो. ठरलेल्या वेळापत्रकानुसार पुन्हा लसीकरण (बूस्टर डोस) आवश्यक असतो. लस दिलेल्या जनावरांचे दूध, मांस वापरू नये. बहुतेक लशीमुळे दूध किंवा मांसावर विपरीत परिणाम होत नाही. मात्र विशेष लसीकरणासाठी पशुवैद्यकांचा सल्ला घ्यावा. लसीकरणामुळे दूध उत्पादनावर परिणाम होत नाही. उलट जनावरे रोगांपासून सुरक्षित राहिल्यामुळे उत्पादन स्थिर राहते. लसीकरणानंतर काही दिवस जनावरांना इतर आजारी जनावरांपासून दूर ठेवावे, गर्दी टाळणे फायद्याचे असते.

## रब्बीमध्ये घ्या मोहरीचे उत्पादन ; योग्य नियोजन केल्यास मिळेल मोठा नफा



भारतात रब्बी हंगामात मोहरीची लागवड केली जाते, त्याच्या लागवडीसाठी शेताची चांगली नांगरणी करणे अत्यंत आवश्यक आहे, त्यासोबतच सिंचनाचीही व्यवस्था करावी. आजकाल मोहरीचे विविध प्रकार बाजारात उपलब्ध आहेत, त्यामुळे मोहरीच्या विविध जातींबद्दल माहिती घेऊन लागवड केल्यास चांगला नफा कमवू शकता. यामध्ये तुम्हाला जास्त मेहनत करण्याची गरज नाही.

नवगोल्ड : मोहरीच्या नवगोल्ड जातीसाठी २० ते २५ अंश सेल्सिअस उत्पादन तापमान आवश्यक आहे. त्याची लागवड सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते, परंतु त्याचे चांगले उत्पादन वालुकामय जमिनीत मिळू शकते. त्याचे बियाणे जमिनीत व्यवस्थित फिरवून पेरले पाहिजे. त्यामुळे उत्पादनात दुप्पट नफा होतो. मोहरीच्या नवगोल्ड जातीच्या लागवडीसाठी सर्वप्रथम शेताची नांगरणी रोटाव्हेटरने करावी व पाट्याच्या साहाय्याने समतल करावी. मोहरीचे चांगले उत्पादन सपाट जमिनीतच मिळू शकते. नवगोल्ड जातीचे बियाणे नवीन वैज्ञानिक पद्धतीने तयार केले जाते. या पिकाला संपूर्ण लागवड प्रक्रियेत एकच सिंचन आवश्यक आहे. पिकाला फुलोऱ्याच्या वेळीच पाणी द्यावे.

खत व्यवस्थापन : या जातीच्या मोहरीच्या बियांसाठी सेंद्रिय खताचा वापर अधिक चांगला मानला जातो. त्याच्या लागवडीसाठी शेणखत वापरावे. जमिनीत नत्र, स्फुरद, पालाश यांचे प्रमाण संतुलित ठेवावे. तुम्ही जर यासाठी शेणखताचा वापर केला तर तुमहाला यामधून चांगले उत्पन्न निघेल आणि उत्पन्न वाढल्यानंतर तुम्हाला चांगले पैसे देखील यामधून मिळतील. त्यामुळे याची शेती योग्य पद्धतीने करून तुम्ही देखील चांगले पैसे कमावू शकता.

## उसाचे वजन आणि साखरेचा उतारा टिकवण्यासाठी उपाय

ऊस तोडणीपूर्वी योग्य नियोजन केल्यास तोडणीदरम्यान होणारी तूट टाळता येऊ शकते. शेतकऱ्यांनी तोडणीपूर्वी आवश्यक काळजी घेतल्यास ऊसाची तूट कमी होऊन साखरेचा उतारा वाढवता येऊ शकतो.

योग्य वेळेवर ऊस तोडणीचे महत्त्व : उसाची तोडणी योग्य परिपक्वतेच्या अवस्थेत करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण त्यावरच साखरेचा उतारा, रसाची गुणवत्ता आणि आर्थिक परतावा अवलंबून असतो. जर ऊस अपरिपक्व अवस्थेत तोडला गेला तर त्यातील साखर पूर्णपणे तयार झालेली नसते, त्यामुळे रस पातळ राहतो, साखरेचे प्रमाण कमी मिळते आणि कारखान्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

अति परिपक्व ऊसाचे तोटे : अति परिपक्व ऊस उशिरा तोडल्यास गोडी कमी होते, साखरेचे रेणू ''रिड्युसिंग शुगर'' मध्ये रूपांतरित होऊ लागतात, ज्यामुळे फर्मेंटेशन सुरू होऊन साखर नष्ट होते आणि कारखान्याला कमी उतारा मिळतो. परंतु योग्य परिपक्वतेच्या अवस्थेत म्हणजे ब्रिक्स १८ ते २० टक्के असताना ऊस तोड केल्यास साखर उतारा वाढतो, उत्पादनाची गुणवत्ता सुधारते. त्यामुळे ऊस परिपक्वता तपासूनच ऊस तोडणी करणे खूप आवश्यक आहे.

तोडणीपूर्वी पाणी देण्याचा परिणाम : अनेक शेतकऱ्यांचा असा समज असतो की तोडणीपूर्वी पाणी दिल्यास उसाचे वजन वाढेल, साखर वाढेल. परंतु हा मोठा गैरसमज आहे. उलट तोडणीपूर्वी पाणी दिल्यास उसाच्या पेशींमध्ये पाण्याचे प्रमाण वाढते आणि रस पातळ होतो. तसेच अतिपाणी दिलेल्या उसामध्ये ओलावा जास्त असल्यास तोडणीनंतर तो लवकर कुजतो किंवा आंबतो.



त्यामुळे ऊसातील साखरेचे प्रमाण कमी होते. पाणी देणे थांबविल्यास उसाच्या कांडीमध्ये रस घट्ट होतो व साखर साठायला लागते. त्यामुळे तोडणीवेळी कारखान्याला मिळणारा साखर उतारा जास्त मिळतो. म्हणून ऊस तोडणीच्या १५-२० दिवस आधी पाणी बंद केल्यास उसाचा ओलावा कमी राहतो आणि तोडणीनंतर गुणवत्तायुक्त व टिकाऊ उस मिळतो.

उसाची जमिनीलगत तोडणी : ऊस तोडणी नेहमी जमिनीलगत करावी. कारण उसाच्या खालच्या कांड्या सर्वात परिपक्व आणि गोड असतात. या भागामध्ये साखरेचे प्रमाणही जास्त असते, तर वरच्या भागात अजून अपूर्ण साखर म्हणजेच ग्लुकोज व फ्रुक्टोज चे प्रमाण अधिक असते. त्यामुळे वरून तोडणी केल्यास साखरेचा उतारा कमी मिळतो आणि कारखान्याला दर्जेदार ऊस मिळत नाही. जमिनीच्या लगत तोडणी केल्यास खोडवा एकसमान व जोमदार फुटतो. वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट मध्ये झालेल्या संशोधनानुसार, जमिनीलगत ऊस तोडणी केल्यास साखरेचा उतारा ०.८-१.० टक्क्यांनी अधिक मिळतो. त्यामुळे स्वच्छ कोयत्याने, माती न येता, पाचट काढून, जमिनीलगत ऊस कापणे हे तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे.

रासायनिक खतांचा परिणाम : शेतकऱ्यांनी तोडणीपूर्वी रासायनिक खतांचा वापर केल्यास रसातील द्रव पदार्थांचे प्रमाण वाढते आणि रस आंबट होतो त्यातील साखर कमी होते यामुळे कारखान्याच्या क्रशिंग प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात व साखरेचा रंग, गुणवत्ता व उतारा दोन्ही कमी होतात.

सध्या पाऊस चालू असल्याने शेतकऱ्यांनी तोडणीला सुरुवात करु नये. काही दिवस थांबून वाफसा आल्यानंतर तोडणी करावी. तसेच उसाला २७० दिवसांनी खत देऊ नये म्हणून आता कोणत्याही प्रकारचे खत आणि पाणी पिकाला शेतकऱ्यांनी देऊ नये. उसाला पाण्याचा ताण पडल्यावर उसामध्ये साखर साचते, आणि उतारा चांगला मिळतो. असा सल्ला वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथील वैज्ञानिक अधिकारी डॉ. समाधान सुरवसे यांनी दिला.

तोडणीनंतर ऊसाची हाताळणी : ऊस तोडल्यानंतर त्यातील पेशी श्वसनक्रिया सुरू ठेवतात, त्यामुळे उसातील साखर हळूहळू ग्लुकोज आणि फ्रुक्टोजमध्ये रूपांतरित होते. या प्रक्रियेला ''इन्व्हर्जन '' म्हणतात. तोडणीनंतर ऊस उघड्यावर ठेवल्यास सूर्यप्रकाश आणि उष्णतेमुळे त्यातील रसाचे बाष्पीभवन होते. काही वेळा ऊस आंबतो, त्यामध्ये बुरशी किंवा जिवाणू वाढतात. त्यामुळे साखरेचा उतारा घटतो आणि अशा उसापासून मिळणारी साखर पिवळट व कमी दर्जाची असते. त्यामुळे तोडणीपासून गाळपापर्यंतचा कालावधी २४ तासांपेक्षा अधिक नसावा.



रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# ७११ रुपयांचा थकबाकी प्रश्न तापला; कुकडी कारखान्याविरोधात शेतकऱ्यांचा आक्रोश

अहिल्यानगर । प्रतिनिधी

कुकडी सहकारी साखर कारखान्याने (पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा) २०२२-२३ या गाळप हंगामात जाहीर केलेल्या ऊसाच्या प्रतिटन २९११ रूपयांपैकी ७११ रूपये अद्याप न दिल्याने नेवासा व शेवगाव तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (३१ ऑक्टोबर) झालेल्या समन्वय बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली.



शेतकऱ्यांनी कारखान्याच्या संचालकांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत आक्रमक भूमिका घेतली. काही शेतकऱ्यांना पूर्ण दर देऊन इतरांना कमी दर दिल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे बैठकीस उपस्थित अधिकारी काही काळ गप्प झाले. ऊस दर, वाहतूक दर, वजन काटा, रिकव्हरी आदी महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या उपस्थितीत समन्वय बैठक आली कुकडी शेतकरी आयोजित करण्यात होती. या बैठकीत कारखान्याविषयी आक्रमक झाले होते. कुकडी सहकारी साखर कारखान्याने २०२२-२३ हंगामासाठी ऊसाला प्रतिटन २९११ रूपये दर जाहीर केला होता. एफआरपीपेक्षा अधिक दर मिळणार असल्याने नेवासा व शेवगाव भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊस दिला. सुरूवातीला विश्वास संपादन करण्यासाठी काही शेतकऱ्यांना ठरल्याप्रमाणे पूर्ण पेमेंट देण्यात आले. मात्र नंतरच्या काळात अनेकांना फक्त प्रतिटन २२११ रूपये इतकेच पैसे देण्यात आले. दोन वर्षे उलटूनही प्रतिटन ७११ रूपयांची थकबाकी शेतकऱ्यांना मिळालेली नाही. थकीत पेमेंट १५ टक्के व्याजासह द्या, कारखाना बंद ठेवा, भंगारात विका, पण आमच्या कष्टाचे पैसे आम्हाला मिळालेच पाहिजेत, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. बैठकीच्या अखेरीस कुकडी कारखान्याचे प्रतिनिधी उपस्थित झाले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हिंगे यांनी थकीत रकमेबाबत त्यांना जाब विचारला. त्यावर कारखान्याच्या प्रतिनिधींनी सांगितले की, आम्ही प्रतिटन २८११ रूपयांचा दर जाहीर केला होता. त्यापैकी २२११ रूपये शेतकऱ्यांना दिले असून उर्वरित ६११ रूपये १५ दिवसांत देऊ. यावर शेतकऱ्यांनी आक्षेप घेत सांगितले की त्यांना ७११ रूपये प्रतिटन थकीत आहेत. या वादावर निर्णय घेण्यासाठी हिंगे यांनी मध्यस्थी करण्याचे आश्वासन दिले.

# एमआयडीसी हद्दीत चार लाखांचा गुटखा पकडला




अहिल्यानगर । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेने एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील निंबळक बायपास उड्डाणपुलाजवळील एक किराणा दुकान आणि विळद घाट येथील एका हॉटेलवर छापे टाकले. या कारवाईत दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून सुमारे चार लाख रूपये किमतीचा गुटखा व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे.

याप्रकरणी बापु मच्छिंद्र कोतकर (वय ४०, रा. निंबळक बायपास) आणि माऊली उर्फ ज्ञानेश्वर गायकवाड (रा. हॉटेल हर्षदा, विळद घाट) या दोघांविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंमलदार विष्णू भागवत यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. निंबळक उड्डाणपुलाजवळील रेणुका किराणा स्टोअर्समध्ये आणि अहिल्यानगर-मनमाड रस्त्यावरील हॉटेल हर्षदामध्ये प्रतिबंधित गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुरूवारी सकाळी दोन्ही ठिकाणी कारवाई केली. या छाप्यात पोलिसांना विविध कंपनीचा गुटखा व सुगंधित तंबाखूचा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी दोन्ही ठिकाणांहून एकूण चार लाख पाच हजार ५८५ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# थकीत बिलांच्या मागणीसाठी गोकुळ शुगरच्या ट्रकवर दगडफेक

धाराशीव । प्रतिनिधी

गेल्या वर्षीच्या ऊस गळीत हंगामातील ऊस क उत्पादक शेतकऱ्यांचे बील अद्याप न न मिळाल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी गोकुळ शुगर, धोत्री (ता. दक्षिण व सोलापूर) या कारखान्याच्या उस वाहतूक करणाऱ्या ट्रकवर दगडफेक करत गाडीच्या काचा फोडल्याची व घटना मैलारपूर खंडोबा मंदिर परिसरात । घडली. या घटनेमुळे परिसरात र तणावाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांचा संताप तीव्र स्वरूप धारण करत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, नळदुर्ग, येडोळा, वागदरी, शहापूर, र्व दहिटणा आदी भागातील शेतकऱ्यांनी १ नोव्हेंबर २०२४ मध्ये गोकुळ शुगर कारखान्याकडे ऊस घातला होता. मात्र हंगाम संपून जवळपास एक वर्ष उलटून गेले तरी शेतकऱ्यांना उसाचे संपूर्ण बील मिळाले नाही. काहींना प्रती टन ५०० ते २००० रुपये इतके अंशतः पैसे मिळाले असले तरी बहुसंख्य शेतकऱ्यांना एक रुपयाही मिळालेला नाही. शेतकरी अनेक वेळा कारखान्यावर गेले असता, मालक किंवा अधिकाऱ्यांकडून केवळ टोलवाटोलवीची उत्तरे मिळाल्याने संताप वाढला. दरम्यान, ६ नोव्हेंबर रोजी गोकुळ शुगरचा मोळी टाकण्याचा कार्यक्रम होणार असल्याने कारखान्याच्या गाड्या पुन्हा भागात दाखल झाल्या. याचदरम्यान शेतकऱ्यांनी ट्रक (एमएच २५ एयू ०३१६) वर दगडफेक करून काचा फोडल्या. शेतकऱ्यांनी दोन दिवसात थकीत उस बीले त्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी केली असून, अन्यथा गोकुळ शुगरच्या उस वाहतूक करणाऱ्या गाड्या ग्रामीण भागात फिरू दिल्या जाणार नाहीत, असा इशारा दिला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या आवाहनानुसार हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# भररस्त्यात टोळक्याकडून तरुणाची निघृण हत्या

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

वर्चस्ववादातून टोळक्याने चाकूहल्ल्याचा बदला घेण्यासाठी तरुणावर भररस्त्यात तलवारीने हल्ला केला. गळा, मान, हात, पाय, डोक्यात सपासप वार करून निघृण हत्या केली. ही घटना शुक्रवारी शहाबाजार, सिटीझन हॉस्पिटलसमोर घडली. समीर खान इनायत खान (३०, रा. काचीवाडा, शहाबाजार) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे.



हत्येनंतर पसार झालेले आरोपी शोएब अन्वर खान (२१), इसरार खान निसार खान (२३, दोघे रा. राहत कॉलनी, पंचायत समितीमागे), मोहम्मद नासेर मोहम्मद फारुख ऊर्फ इंता (३२, रा. रशीदपुरा) आणि इस्लाम खान खमर खान ऊर्फ असलम चाऊस (२७, रा. शहागंज भाजी मंडई) यांना अटक केल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी दिली. पाचवा आरोपी आसिफ रायडर हा फरार आहे. तीन दिवसांपूर्वी शोएबवर चाकूहल्ल्याप्रकरणी समीर खानसह अन्य तिघांवर गुन्हा दाखल होता. या घटनेनंतरच बदला घेण्यासाठी ही हत्या झाल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. फिर्यादी मृत समीरची पत्नी सना कौसर समीर खान (२५) यांच्या तक्रारीनुसार, तिचा पती समीर खान हा भाजीविक्रीचा व्यवसाय करत होता. त्यांना तीन मुली आहेत. मंगळवारी (दि. २८) रात्री शोएबने समीर, शाहरुख याच्याविरुद्ध शस्त्राने मारल्याचा सिटी चौक ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर बुधवारी सना या समीर सोबत ठाण्यात तक्रार दिली. त्यात सोमवारी (दि.२७) आरोपी असिफ, हाफिज ऊर्फ टकला, शोएब काला यांनी शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार नोंदविली होती. त्यावरून आसिफ रायडरने समीरला फोन करून तुझे किसी के हाथ से मार दूंगा, तेरा मर्डर करूंगा, अशी धमकी दिली होती. समीरच्या हत्येप्रकरणी सिटी चौक ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास एपीआय मनोज शिंदे करत आहेत.

# शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे काम सुरु-डॉ. प्रतिभा गोरे

मंठा । प्रतिनिधी

मंठा व परतूर तालुक्यातील माहे जुलै व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने शेतपिकाच्या नुकसानाचे पंचनामे करण्यात आले व मंठा तालुक्यातील माहे जुलै महिन्यातील शेती पिक नुकसान अनुदान वाटप करिता दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार याद्या अपलोड करण्यात आल्या आहेत.



जुलै महिन्यातील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी मंठा तालुक्यासाठी रु. ७,००,४१,३८५/- (सात कोटी एकेचाळीस हजार तिनशे पंच्याऐंशी रुपये) प्राप्त झालेले आहेत. तसेच माहे स्पटेंबर मधील नुकसान अनुदान वाटपासाठी दि.२०/१०/२०२५ व २९/१०/२०२५ शासन निर्णयाद्वारे उपलब्ध झाले असून, स्पटेबर २०२५ मधील नुकसानग्रस्त शेतकरी याद्या अपलोड करण्याची प्रक्रीया युध्द पातळीवर सुरु आहे. अशी माहिती मंठा परतूर चे तहसीलदार डॉ. श्रीमती प्रतिभा गोरे यांनी दिली. माहे सप्टेंबरच्या सततच्या पावसामुळे मंठा तालुक्यातील एकुण रु. ३९,८४,८३,०९०/- (एकोनचाळीस कोटी चौऱ्याऐंशी लक्ष त्र्याऐंशी हजार नव्वद रुपये) अनुदान लवकरच सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचे काम सुरु आहे, अशी माहिती तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी दिली असून, लवकर शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये अनुदान जमा होणार आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ३०/१०/२०२५

नाव बदलण्याचा

## जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) चंद्रशेखर प्रकाशराव पालवे २ मयुरी चंद्रशेखर पालवे सर्व्हे नं.-३८ सहन प्लॉट नं. ८ नं.प.मि.नं.१८-७४-८ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-७४-८) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १२ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. ५ व ६
दक्षिण- प्लॉट नं. ७
उत्तरः प्लॉट नं. ९

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

# पोस्टाच्या डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहनसाठी जनजागृती मोहीम

जालना । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये पीएलआय, आरपीएलआयमध्ये डिजिटल व्यवहारांचा प्रसार व मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम डाक विभागाच्यावतीने राबविली जात आहे.वर्ष २०२५ च्या अखेरपर्यंत पोस्टल लाईफ इन्शुरन्स आणि ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्समध्ये डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवली जात आहे. सर्व विमाधारकांनी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयात भेट देऊन संपर्क माहिती अद्ययावत करून डिजिटल व्यवहारांची सुविधा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पोस्टाच्या डिजीटल व्यवहार विशेष जनजागृती मोहीम उपक्रमाचा उद्देश ग्राहकांना सुलभ सेवा प्रदान करणे व व्यवहारांमध्ये पारदर्शकता ठेवणे आहे. ग्राहकांना त्यांच्या पीएलआय, आरपीएलआय खात्यांमध्ये मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अद्ययावत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून हप्त्याची माहिती, पावत्या व इतर महत्वाच्या सूचना वेळेवर प्राप्त होऊ शकतील. डाक कर्मचारी हे ग्राहकांना संपर्क माहिती अद्ययावत करण्यात मदत करत आहेत. तसेच डिजिटल पेमेंट करण्याबाबत मार्गदर्शनही करत आहेत. हा उपक्रम ग्राहक समाधानी सेवा व डिजिटल पोहोच वाढवण्याच्या दिशेने एक पाऊल आहे.

# परभणी विभागासाठी नवीन सी-बँड रडार मंजूर, मराठवाड्याच्या हवामान अंदाजात वाढ

परभणी। प्रतिनिधी

मराठवाड्यातील हवामान अंदाजासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण व पाणीपुरवठा राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर परभणी विभागासाठी नवीन सी-बँड डॉपलर वेदर रडार (डीडब्ल्यूआर) बसविण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मिशन मौसम योजनेंतर्गत मंजूर केला आहे.



केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी पाठविलेल्या पत्राद्वारे ही मंजुरी मिळाल्याची माहिती दिली आहे. सध्या सोलापूर येथे कार्यरत असलेला २५० कि. मी. परिधाचा रडार परभणी व नांदेड परिसरातील हवामान निरी क्षणासाठी वापरला जात आहे. तथापि, स्थानिक पातळीवरील अचूक हवामान अंदाजासाठी स्वतंत्र रडार केंद्राची गरज भासत होती. या मंजुरीनंतर परभणी विभागात सी-बैंड रडार उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यामुळे मराठवाड्यातील हवामान निरीक्षण, पूर्वसूचना आणि पिक संरक्षण क्षमतांमध्ये मोठी वाढ होणार आहे. तसेच म्हैसमळ टेकडी, छत्रपती संभाजीनगर येथे सो-बैंड प्रकारचा २५० कि.मी. परिघाचा रडार बसविण्याचे कामही सुरू आहे. या दोन्ही केंद्रांच्या माध्यमातून संपूर्ण मराठवाडा प्रदेशाचे हवामान अधिक अचूकपणे नोंदवता येईल. राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, मराठवाडा हा दुष्काळप्रवण प्रदेश असून शेतकऱ्यांना वेळेवर हवामानाची अचूक माहिती मिळणे अत्यावश्यक आहे. या रडारमुळे शेती, पिकसंरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी अधिक नेमकी माहिती उपलब्ध होईल, केंद्र सरकारकडून मिळालेल्या या सकारात्मक प्रतिसादामुळे मराठवाड्यातील हवामान अंदाज व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, साकोरे-बोर्डीकर यांनी या निर्णयाबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

जाहिर प्रगटन

## तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३०४/२०२५**
**डिगांबर किसन खंदारे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण**

पहा

डिगांबर किसन खंदारे रा. कारेगव्हाण ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समाधान डिगांबर खंदारे यांचा दिनांक १५/०६/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २७/१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/११/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०८०**
**दिनांक - ३१/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सिमा बेगम रियाजोद्दिन खतिब रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिमा बेगम रियाजोद्दिन खतिब | स्वतः | ०२/०२/१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# रेणापूर तहसीलच्या दालनात टाकल्या गोगलगायी; सोयाबीनही दिले पेटवून

लातूर। प्रतिनिधी

२८ ऑक्टोबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रेणापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पावसामुळे सोयाबीन भिजत आहे. त्यातच आता शेतकऱ्यासमोर मोठ्या शंखी गोगलगायीचे संकट उभे ठाकले आहे. तुरी, हरभरा, करडई व इतर रब्बी हंगामातील पिकांवर तसेच ऊसावर मोठ्या शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष गजानन बोळंगे व इतर शेतकऱ्यांनी शेतातील गोगलगायी जमा करून तहसील कार्यालयाच्या गाभाऱ्यात आणून टाकल्या व खराब सोयाबीनची होळी करून शासनाचा जाहिर निषेध केला.





नव्याने पेरणी केलेल्या पिकांवर पाणी साचल्याने ती पूर्णपणे नष्ट झाली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे उत्पन्न हातातून निसटल्याने त्यांच्यावर हतबलतेची वेळ आली आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी रेणापूर तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष गजानन बोळंगे यांनी केली आहे. गुरुवारी ३० ऑक्टोबर रोजी पोत्यात भरून आणलेल्या शंखी गोगलगायी तहसीलच्या गाभाऱ्यात टाकुन सोबत आणलेले सोयाबीन पेटवुन दिले. यावेळी बोळंगे यांनी शासनाच्या विरोधात घोषणा देवुन शासनाच्या धोरणांचा निषेध केला. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई जमा करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. खलंग्री, व्हटी व इतर परिसरात शेतावर पसर-लेल्या शंखी गोगलगायीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा शेतकरी सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. यावेळी व्हटी व खलंग्री भागातील गणेश सुरवसे, दिलीप बोकडे, सदाशिव सुर्यवंशी, रंगनाथ झुलपे, प्रल्हाद सुरवसे, शेतकरी उपस्थित होते.

# महसूल-पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने गोदामाय पोखरली

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा स्वच्छ प्रशासनाचा दावा, वाळू माफिया मात्र मोकाट

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये एकाही ठिकाणचा वाळूचा ठेका दिलेला नसतानाही जिल्ह्यामध्ये आजही वारेमाप वाळू उपसा चालू आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक स्वच्छ प्रशासनाचा दावा करतात. आमचे अधिकारी आणि कर्मचारी नियमानुसार आणि चांगले काम करत आहेत असा दावा करतात. तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी आणि संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याच्या आशीर्वादानेच हे वाळूमाफिया सर्रास वाळू उपसा करत असून ते एवढे मस्तावले आहेत की विरोध करणाऱ्यांच्या अंगावर गाडी घालायला मागेपुढे पाहत नाहीत. हे नेमके काय चालले आहे. आणि जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांचे लक्ष नेमके कोठे आहे. असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, परळी या जिल्ह्याला लागून गोदावरी नदी वाहते. या भागात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होतो. आज बीड जिल्ह्यामध्ये एकही वाळू उपशाची निविदा जाहीर झालेली नाही किंवा कोणालाही ठेका दिलेला नाही. तरी वाळू उपसा चालूच आहे. या पाठीमागचे गोडबंगाल नेमके काय आहे? हे कळत नाही. बीड जिल्ह्यातील चकलांबा, गेवराई ,तलवाडा, माजलगाव ग्रामीण, परळी ग्रामीण या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सर्रास वाळू उपसा चालू आहे. मात्र यावर कोणाचा अंकुश असलेला दिसत नाही. वास्तविक पाहता संबंधित तालुक्याचे तहसीलदार, त्या भागाचे मंडल अधिकारी आणि तलाठी यांनी याला विरोध करायला हवा किंवा यावर अंकुश ठेवायला हवा. मात्र तसे होतांना दिसत नाही. यालाच जोडून संबंधित पोलीस ठाण्याचे ठाणेदार आणि कर्मचारी हे ही यात सहभागी आहेत की काय? असे शंका येते.एवढी मोठी यंत्रणा असूनही वाळू उपसा चालू कसा राहतो. हा मोठा प्रश्न आहे जर



एखाद्या गावामध्ये वाळू उपसा करण्यासाठी नागरिकांनी विरोध केला. तर त्या गावच्या प्रमुखावर गाडी घालून त्याला ठार मारण्याची धमकी दिली जाते .इतके हे वाळू माफिया मस्तावले आहेत.ही मस्ती कोणाच्या जीवावर आहे. हे सर्वश्रुत आहे.महसूल आणि पोलीस प्रशासनाने जर ठरवले तर एकही टिप्पर वाळू बाहेर जाऊ द्यायची नाही. तर एकही टिप्पर वाळू जाणार नाही.कोणीही जेसीबी आणि ट्रॅक्टर गोदावरी पात्रात घालण्याचा प्रयत्न करणार नाही. मात्र तसे होताना दिसत नाही. सर्रास वाळूचा उपसा चालू असतानाही अधिकारी बघ्याची भूमिका का घेत आहेत? या पाठीमागे कुठले अर्थकारण दडले आहे? सर्व सामान्य माणूस या बाबीला विरोध करू शकत नाही. ज्यांना अधिकार आहेत ते मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत. मागील काही काळामध्ये तत्कालीन जिल्हा अधिकाऱ्यांच्या गाडीवर टिप्पर घालण्याचा प्रयत्न केला. ही मस्ती कुठून आली. जर प्रशासनाने ठरवले तर यांचा बंदोबस्त एका तासात होईल. मात्र प्रशासनाची इच्छा दिसत नाही. आमचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक मात्र सर्व काही व्यवस्थित चालले आहे असे सांगत आहेत. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली तर पोलिसांचेही ऑलवेल चालू आहे आणि महसूल प्रशासनाचेही चालू आहे. अधिकाऱ्यांची दिशाभूल करून हे आपली तुंबडी भरण्याचे काम करत आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी अचानक या भागामध्ये धाड टाकून परिस्थिती पाहिली तर त्यांना सत्य परिस्थिती लक्षात येईल. सर्वसामान्य माणसाच्या आवाक्या बाहेरचे असलेले मस्तावलेले टिप्पर चालक आणि वाळू माफिया कोणालाही मोजत नाहीत.या नंबर दोनच्या पैशाच्या जीवावरच त्यांची दादागिरी चालते. गावागावातले वातावरण खराब करण्याचे काम हे वाळू माफिया करत आहेत. यावर अंकुश घातला नाही तर आपल्याकडे लोकशाही राहणार नाही. या वाळू माफियांना लगाम घालण्यासाठी आता जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना प्रत्यक्ष फिल्डवर उतरावे लागेल आणि अचानक धाडी टाकून या वाळूमाफियांचा बंदोबस्त करावा लागेल. नसता जिल्ह्यामध्ये अराजकता माजण्यास वेळ लागणार नाही. आधी सर्वसामान्य माणूस या दादागिरीला कंटाळून जीव मुठीत घेऊन रहात आहे. सर्वसामान्य माणसाची दखल ना पोलीस घेतात. ना महसूल प्रशासन घेते. या फुकटच्या पैशाच्या जीवावर पोलिस आणी महसूल अधिकारीही आता मग्रूर झाल्यासारखे वागत आहेत. याचा बंदोबस्त वेळेत केला नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाईल. याचीही दक्षता जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी घेणे गरजेचे आहे.

# शासकीय कापूस खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ

## माजलगाव बाजार समितीच्या प्रयत्नांना यश


माजलगाव । प्रतिनिधी

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वतीने शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्रीसाठी नोंदणीची मुदत दि. ३१ ऑक्टोबर पर्यंतच होती. परंतु माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच. एन. सवणे यांनी सिसीआयशी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याची दखल घेत सिसीआयने दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणीची मुदतवाढ दिली असल्याने शेतक-यांना दिलासा मिळाला आहे.

हवामानातील अनिश्चितता, हंगामाच्या शेवटपर्यंत झालेला पाऊस आणि शेतकऱ्यांची कापूस वेचणी सुरू न झाल्याने मोठ्या संख्येने शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर माजलगाव बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच कृषी खात्याकडे वेळो - वेळी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याची दाखल कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सिसीआय) ने घेत शासकीय कापूस खरेदी नोंदणीची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ वरून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे माजलगाव तालुक्यातील तसेच अनेक भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, कापूस हमीभावाने विक्रीसाठी अधिक शेतकरी नोंदणी करू शकतील. ३१ डिसेंबर पर्यंत झालेल्या मुदतवाढीत शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त नोंदी करून घ्याव्यात व नोंदी पासून कोणीही शेतकरी बांधवांनी वंचित राहू नये असे आवाहन उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव चे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच. एन. सवने यांनी केले आहे.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवारी गोरक्षनाथ प्रगटदिन महासोहळा





### गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांची भव्य पालखी मिरणूक

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि. ०३ नोव्हेंबर रोजी सोमवारी गोरक्षनाथ महाराज प्रगटदिन सोहळा ह.भ.प.गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी सकाळी ४ वाजता गोरक्षनाथ महाराज प्रगटदिन सोहळा सुरू होणार आहे सकाळी ४:३० वाजता ह.भ.प.गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची भव्य पान २ वर




# मैथिली सुरेश धस हिची महाराष्ट्र राज्य हॅण्डबॉल संघात निवड

आष्टी । प्रतिनिधी

कामोठे (पनवेल) येथे दिनांक २८ ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय हॅण्डबॉल स्पर्धा व निवड चाचणी या स्पर्धेत आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल येथील विद्यार्थिनी मैथिली सुरेश धस (वयोगट १७ वर्षांखालील मुली) हिने आपल्या उत्कृष्ट आणि प्रभावी कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र राज्य हॅण्डबॉल संघात स्थान पटकावले आहे.

मैथिली हिच्या या उल्लेखनीय यशामुळे ती आता येत्या शालेय राष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार असून, तिच्या या कामगिरीने आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्याचा मान उंचावला आहे.मैथिली हिने स्पर्धेत आपल्या चिकाटी, निष्ठा आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर उत्कृष्ट कामगिरी साकारली.तिला या टप्प्यापर्यंत पोहोचविण्यासाठी क्रीडा मार्गदर्शक अजिम शेख आणि दिपाली काकडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल आमदार सुरेश धस, प्राजक्ता धस,देवस्थानचे सर्व ट्रस्टी,अनिषा ग्लोबल स्कूलचे प्राचार्य अविनाश राऊत,तपन गौडा, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मैथिलीचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदे,एक दिवसीय प्रशिक्षण

बीड । प्रतिनिधी

होम फॉर द चिल्ड्रन फाउंडेशन मुंबई,जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीड,जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय बीड राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बाल कल्याण पोलिस अधिकारी यांना ''बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,



२०१५'' तसेच ''लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२'' संदर्भातील प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पल्लवी जाधव,मनीषा तोकले, छाया गडगे सदस्य बालकल्याण समिती बीड, तत्वशिल कांबळे आदी उपस्थित होते प्रमुख मार्गदर्शक म्हणून परम आनंद, वसीम शेख, सचिन करंजुले तत्वशिल कांबळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तत्त्वशील कांबळे यांनी केले यावेळी मनोगत पान २ वर

# कुप्पा गावच्या उपसरपंचपदी सुरेश सावंत

## आ.प्रकाश सोळंके, जयसिंग सोळंके यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा

वडवणी । प्रतिनिधी

बाजारपेठेचे गाव असलेल्या कुप्पा गावच्या उपसरपंचपदी सुरेश सखाराम सावंत यांची आई रत्नमाला सखाराम सावंत यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीचे माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांनी सुरेश सावंत यांचा भव्य



कार्यक्रमात सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

वडवणी तालुक्यातील कुप्पा हे बाजारपेठेचे मोठे गाव आहे या गावची ग्रामपंचायत आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या गटाच्या ताब्यात आहे. या ठिकाणी उपसरपंच पदी रामराव पवार यांची अडीच वर्षांपूर्वी निवड झाली होती. त्यानंतर सुरेश सावंत यांना ही पान २ वर

# माजलगाव शहरात एकाच रात्रीत चार दुकानात चोरी

## अज्ञात चोरट्यांनी चार दुकानातील शटर उचकून केली चोरी, दुकानातील नगदी रक्कमेसह लाखोंचा ऐवज लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील जुना मोढा परिसर पुन्हा एकदा चोरट्यांच्या निशाण्यावर आला आहे.दि ३१ ऑक्टोबर गुरुवारच्या मध्यरात्री या भागात तीन ठिकाणी दोन किराणा दुकान, एक मेडिकल व बीड रोडवरील सिमेंट दुकान फोडण्यात आली. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी सदरील दुकानातून नगदी रकमेसह लाखोचा मुद्देमाल लंपास केला असून यासंदर्भात शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव शहरातील जुन्या मोढा भागातील कुलदीप सोळंके यांचे न्यू जय भवानी ट्रेडिंग कंपनी किराणा दुकानाचे शटर तोडून गल्ल्यातील १६ हजार रुपये रक्कम व ड्रायफूट असा ५६ हजार रुपयाचे किराणा सामान चोरून नेले.तर याच ठिकाणी घायतिडक यांच्या तुळजाभवानी किराणा दुकानाचे शटर तोडून नुकसान केले. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब




आंबेडकर चौक येथील जगदीश मेडिकल फोडण्याचा प्रयत्नही करण्यात आला.दरम्यान गेवराई रोडवर साबळे हॉस्पिटल समोर असणारे इंजिनीयर भोसले यांचे सांडेश्वर ट्रेडिंग सिमेंटचे दुकान फोडून गल्ल्यातील ३ लाख ४९ हजार रुपये नेले.यावेळी चोरट्यांनी दुकानातील सीडीआरचेही नुकसान केले. पान २ वर




# डॉ.संपदा मुंडे आत्महत्ये प्रकरणी एसडीपीआयतर्फे निवेदन

बीड । प्रतिनिधी

डॉ. संपदा मुंडे यांच्या संशयास्पद आत्महत्येच्या (हत्या) प्रकरणी संपूर्ण५ घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, पीडित कुटुंबास न्याय मिळावा आणि जबाबदार व्यक्तींनी आपल्या नैतिक जबाबदारीचा स्वीकार करून तत्काळ राजीनामे द्यावेत, अशी मागणी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया एस.डि.पी.आय.बीड जिल्हा शाखेच्यावतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.



या प्रसंगी एस.डि.पी.आय बीड जिल्हाध्यक्ष सय्यद आबेद अब्बास यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी कॉ.नितिन जायभाये (अध्यक्ष शहर बचाव मंच), माऊली शिरसाट ओबीसी नेते व सामाजिक पान २ वर

# मासिक सभेचे पत्र देऊन सभा घेतली नाही, ग्रा.पं.सदस्य बाळू पोकळेंची बीडीओकडे तक्रार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील ग्रामपंचायत बेलगावचे ग्रामसेवक व सरपंच बेलगाव यांनी दि.३१ आक्टोबर रोजी सकाळी ११ वा. मासीक सभा बैठक आयोजित केली होती.या सभेच्या पत्रावर जरी दि.२४ आक्टोबर तारीख टाकली असली तरी प्रत्यक्ष हे पत्र मला दि.२९ आक्टोबर रोजी दुपारी देण्यात आले म्हणजे सात दिवस अगोदर सभेपूर्वी नोटीस देणे आवश्यक असताना केवळ दोन दिवस अगोदर नोटीस दिली.आज दि. ३१ आक्टोबर २०२५ रोजी मी स्वतः तसेच इतर दोन ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब सुभाष खंडागळे आणि श्रीमती अनिता महादेव पोकळे असे तीन ग्रामपंचायत सदस्य ग्रामपंचायत कार्यालयात बैठकीस उपस्थित राहण्यासाठी सकाळी ११ वा.

गेलो असता ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच,उपसरपंच व ग्रामसेवक कोणीही उपस्थित नव्हते. कार्यालयामध्ये केवळ ग्रामपंचायत कर्मचारी मंगेश खंडागळे (शिपाई) हेच उपस्थित होते बैठकीबाबत मंगेश खंडागळे यांना विचारले असता त्यांनी बैठकी बाबत काही माहिती नसल्याचे सांगितले, नंतर मी माझ्या भ्रमणध्वनीवरून सरपंच तात्यासाहेब शिंदे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी ग्रामसेवक यांच्याशी बोलून घ्या असे सांगितले त्यानंतर मी ग्रामसेवक यांना संपर्क केला असता त्यांनी फोन उचला नाही.आम्ही तिघे ग्रामपंचायत सदस्य तसेच श्रीमती अनिता महादेव पोकळे यांचे पती महादेव मधुकर पोकळे व इतर ग्रामस्थ दोन वाजेपर्यंत (म्हणजे तीन तास) ग्रामपंचायतमध्ये बसून सर्वांची वाट पाहिली तथापी कार्यालयाचे सरपंच, उपसरपंच अथवा ग्रामसेवक यापैकी कोणीही आले नाहीत.बैठकीचे पत्र काढून ग्रामसेवक व सरपंच यांनी बैठक घेतली नाही. बैठकी घेण्याचे कुठलेही सबळ कारण पूर्वी किंवा आज रोजी दिले नाही. आम्ही तिघे जण गेले तीन वर्षे ग्रामपंचायत सदस्य आहोत.या कालावधीमध्ये सरपंच,ग्रामसेवक यांनी बैठका न घेता कामाबाबत कसलीही माहिती न देणे,विकास कामांमध्ये नाकारणे याबाबत सातत्याने सुरु आहे. त्यामुळे मतदारांनी निवडून देऊनही आमच्या प्रभागामध्ये विकास कामे करून शकलो नाही.या संपूर्ण प्रकरणाबाबत आम्ही जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे दि.१७ आक्टोबर रोजी तक्रार,अपील करून ही बाब त्यांच्या निदर्शनात आणलेली आहे. कलेक्टर साहेब यांनी या सर्व गैरप्रकाराची सखोल चौकशी करून व सबंधितांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाखाली कठोर कारवाई करावी अशी मागणी बाळु लक्ष्मण पोकळे ग्रामपंचायत सदस्य, बेलगाव यांनी केली आहे.या निवेदनाच्या प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. बीड यांना दिली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवड महापालिका शाश्वत आणि पर्यावरणपूरक शहरी विकासाच्या दिशेने सातत्याने प्रयत्नशील -संजय कुलकर्णी

पिंपरी । प्रतिनिधी

नवी दिल्ली येथे आयोजित अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स फेस्टिव्हल २०२५ दरम्यान समावेशक, सक्षम व शाश्वत शहरे या विषयाखाली 'इंटरनॅशनल अर्बन अँड रिजनल को-ऑपरेशन' (खणठउ) आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया कार्यक्रमाचा भारतात अधिकृत शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेला आमंत्रित करण्यात आले होते.

यावेळी 'आययूआरसी इंडिया किक-ऑफ मिटिंग' या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर सत्रात युरोपियन युनियनचे प्रतिनिधी, राष्ट्रीय भागीदार तसेच सहा भारतीय पायलट शहरे, ज्यामध्ये चेन्नई, पिंपरी चिंचवड, जबलपूर, कटक, गँगटोक आणि लेह यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी शाश्वत शहरी विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधींवर सखोल चर्चा झाली.




'इंटरनॅशनल अर्बन अँड रिजनल को-ऑपरेशन आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया कार्यक्रम'चा भारतात शुभारंभ

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या योजनांविषयी दिली माहिती

या सत्रात मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रतिनिधित्व करत शहराच्या शाश्वत विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांविषयी माहिती दिली. त्यांनी शहरी नवोपक्रम, सार्वजनिक वाहतूक सुधारणा, हवामान लवचिकता आणि पर्यावरण संरक्षण क्षेत्रातील महापालिकेचे प्रयत्न अधोरेखित केले. तसेच वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या पायाभूत आव्हानांवर मात करण्यासाठी बहुस्तरीय समन्वयाची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. पिंपरी चिंचवड महापालिका सध्या हवामान अनुकूल विकास, हरित गतिशीलता, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवित आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून महापालिका जागतिक पातळीवरील सर्वोत्तम शहरी धोरणे आत्मसात करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

चर्चेदरम्यान हवामान अनुकूलता, सर्क्युलर इकॉनॉमी, डिजिटल नवोपक्रम आणि शाश्वत वित्तपुरवठा या सामाईक प्राधान्य क्षेत्रांवर सविस्तर विचारमंथन झाले. युरोप आणि भारतीय प्रतिनिधींनी या भागीदारीला स्मार्ट सिटीज मिशन आणि नॅशनल अर्बन पॉलिसी फ्रेमवर्कशी सुसंगत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सत्राचा समारोप संयुक्त कृती आराखडे, क्षमता-वृद्धी उपक्रम आणि तांत्रिक देवाणघेवाण सुरू करण्याच्या वचनबद्धतेने झाला. या उपक्रमाने युरोप-भारत सहकार्याच्या एका नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. यावेळी व्हिक्टोरिया कैडालोवा (कार्यक्रम व्यवस्थापक, युरोप सर्व्हिस फॉर फॉरेन पॉलिसी इन्स्ट्रुमेंट्स, बँकॉक), लुट्झ कोप्पेन (धोरण अधिकारी, डायरेक्टरेट जनरल फॉर रिजनल अँड अर्बन पॉलिसी), पाब्लो गांदारा (टीम लीडर, आययूआरसी आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया), तसेच स्मिता सिंग (वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक, युरोप प्रतिनिधीमंडळ) आदी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर शहरांदरम्यान सहकार्य वाढविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. 'आययूआरसी आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया कार्यक्रम' अंतर्गत भारत-युरोप शहर भागीदारीत आमच्या शहराचा समावेश होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे शाश्वत शहरी विकासासाठी नवनवीन कल्पना, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील.

– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड हे वेगाने वाढणारे आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणारे शहर आहे. 'अर्बन इनोव्हेशन, मोबिलिटी आणि क्लायमेट रेसिलियन्स' या क्षेत्रांत युरोपियन शहरांसोबत सहकार्य करण्याची मोठी संधी 'आययूआरसी इंडिया'च्या माध्यमातून मिळाली आहे. बहुउद्देशीय संस्थांमधील समन्वय आणि वेगवान शहरीकरण ही आमची आव्हाने असली तरी, या भागीदारीतून त्यावर सक्षम उपाय शोधता येतील असा आम्हाला विश्वास आहे.

– संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

## रिल्ससाठी जाळ अन् धूर काढणाऱ्या चार बुलेट ताब्यात; बारामती तालुका पोलिसांची कडक कारवाई

बारामती । प्रतिनिधी

सोशल मीडियावर व्हायरल होण्यासाठी आणि शहरात दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या चार बुलेटस्वारांवर बारामती तालुका पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. या तरुणांनी कटफळ पालखी मार्गावरील ब्रिजखाली मोठ्या आवाजात बुलेट चालवत जाळ आणि धूर काढत रेसिंग करत रील्स बनवली होती. ही व्हिडिओ क्लिप दि. २० रोजी सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.



सदर रील्समध्ये वापरलेल्या बुलेट मोटरसायकलींचे क्रमांक एम.एच ४२ बी एच ७४०४, एम.एच १२ पी एल ७६३७, एम.एच १२ के एम ८५९२, एम.एच ४२ बी.ए ५५५३ असे आहेत. या चारही मोटरसायकली पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून, संबंधित चालकांविरुद्ध वाहतूक नियमांचे उल्लंघन, ध्वनी प्रदूषण आणि सार्वजनिक शांतता भंग केल्याबद्दल कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.ही वाहने १५ दिवसांसाठी डिटेन करण्यात आली आहेत.

शहरात वेगाने वाढणाऱ्या 'व्हायरल होण्याच्या' स्पर्धेमुळे युवकांमध्ये रेसिंग, धूर काढणे आणि आवाज वाढवणे या प्रकारात वाढ होत आहे. यामुळे केवळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत नाही, तर वाहतुकीलाही मोठा धोका निर्माण होतो, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पेन्सिल चौक, एमआयडीसी परिसर या ठिकाणी कोणीही अतिवेगाने मोठ्या आवाजात वाहने चालविणे अथवा इतर प्रकार करून वाहतूक नियमांचे उल्लंघन केलेले मिळून आल्यास तत्काळ कळवावे त्यावर कठोर कारवाई केली जाईल.

–चंद्रशेखर यादव, बारामती तालुका पोलीस ठाणे

## पोलीस आयुक्तांच्या आदेशानंतर 'झेप' बंगल्याची संरक्षित भिंत पुन्हा बांधली

पुणे । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, दिवंगत साहित्यिक ना. स. इनामदार यांच्या मुकुंदनगरमधील 'झेप' बंगल्याची तोडलेली संरक्षित भिंत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानंतर बांधकाम व्यावसायिकाने शनिवारी पुन्हा बांधून दिली.

बांधकाम व्यावसायिकाने ३१ ऑक्टोबर रोजी पूर्वसूचना न देता बंगल्याची संरक्षित भिंत पाडून लोखंडी गेट तोडले होते. तसेच बंगल्याचे नुकसान करून ताबा घेण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी इनामदार यांचे जावई सुभाषचंद्र गोपाळराव आरोळे (वय ८०, रा. झेप बंगला, ४२७/७८, टिमवी कॉलनी, गुलटेकडी) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यानुसार बांधकाम व्यावसायिक आणि जेसीबी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे तक्रार करण्यात आली. पोलीस आयुक्तांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत तत्काळ कारवाईचे आदेश दिले. पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते आणि त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर बांधकाम व्यावसायिक आणि कंत्राटदाराला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून पुन्हा या सीमाभिंतीचे बांधकाम करवून घेण्यात आले.इनामदार यांच्या मृत्यूपश्चात आरोळे कुटुंब याठिकाणी राहण्यास आहे. बांधकाम व्यावसायिक आणि आरोळे यांच्यामध्ये खरेदीखत झाले आहे. आरोळे यांनी कागदोपत्री साडेसात कोटी रुपयांना हा बंगला विकला. खरेदीखत झाल्यानंतर तीन महिन्यांत ताबा देण्याचे ठरले. आरोळे यांनी खरेदीखताविषयी आक्षेप घेतले आहेत. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

## नेहरू-गांधींचे विचार नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज – ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी




पुणे । प्रतिनिधी

देशातील साडेपाच हजार धरणांपैकी निम्मी धरणे माजी पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या कार्यकाळात उभारली गेली आहेत. स्वातंत्र्यलढ्यात नेहरू-गांधी घराण्याचे मोठे योगदान असून, सध्याचे सत्ताधारी त्यांच्या कार्याचा इतिहास पुसण्याचे काम करीत आहेत, अशी खंत ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी यांनी व्यक्त केली.शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन बाळासाहेब ठाकरे कलादालन येथे करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी यांच्या हस्ते झाले. या वेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे खजिनदार आणि ज्येष्ठ नेते अॅड. अभय छाजेड, सुनील शिंदे, अजित दरेकर, यासीन शेख, सचिन आडेकर, आबा जगताप, विठ्ठल गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

उल्हास पवार म्हणाले, इंदिरा गांधी या खऱ्या अर्थाने आयर्न लेडी होत्या. पाकिस्तानला शरणागती पत्करायला भाग पाडण्याची ताकद त्यांनी दाखवून दिली. सिक्किमला भारतात विलीन करून त्यांनी देशाचे सार्वभौमत्व दृढ केले. त्यांचे नेतृत्व आणि धैर्य जागतिक पातळीवर भारताला सन्मान मिळवून देणारे ठरले.प्रास्ताविक अॅड. अभय छाजेड यांनी केले, अक्षय जैन यांनी आभार मानले.

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबरला होणार प्रसिद्ध




### १४ नोव्हेंबरपर्यंत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी; क्षेत्रीय कार्यालयानिहाय प्राधिकृत अधिकारी नियुक्त

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची प्रभागनिहाय विभाजित करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी आहे. प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयानिहाय सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण आणि सुनील भागवानी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील २०५-चिंचवड विधानसभा, २०६-पिंपरी विधानसभा, २०७-भोसरी विधानसभा आणि २०३-भोर विधानसभा मतदारसंघ (ताथवडे गाव) या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करून तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या काळात नागरिक आपल्या हरकती व सूचना महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मतदार यादी कक्षात तसेच सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांत प्रत्यक्ष दाखल करू शकतात. या यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी सहशहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय कार्यालयानिहाय प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये 'अ' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयासाठी अजय सूर्यवंशी, 'ब' व 'ग' क्षेत्रीय कार्यालयासाठी अनिल भालसाकळे, 'ड' व 'ह' क्षेत्रीय कार्यालयासाठी माणिक चव्हाण आणि 'क' व 'इ' क्षेत्रीय कार्यालयासाठी सुनील भागवानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्राधिकृत अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची सहायक प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी प्रारूप मतदार यादीबाबत नमुना 'अ' व 'ब' मध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची तपासणी करून आवश्यक अहवाल प्राधिकृत अधिकाऱ्यांना सादर करावा, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## महापालिका सेवेतून सह शहर अभियंता, लेखाधिकारी यांच्यासह २२ जण सेवानिवृत्त



पिंपरी । प्रतिनिधी

सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेत अनेक वर्षे जबाबदारीने, प्रामाणिकपणे कामकाज केलेले आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने महापालिकेचा नावलौकिक वाढविणा-या या अधिकारी,कर्मचाऱ्यांचा आदर्श कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी घ्यावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले तसेच सेवानिवृत्तांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात माहे ऑक्टोबर २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे १२ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले १० अशा एकूण २२ कर्मचा-यांचा अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अभयचंद्र दादेवार,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त दशरथ कांबळे,कार्यकारी अभियंता तथा कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस अभिमान भोसले, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, प्रशासन अधिकारी उमा दरवेश, कामगार कल्याण विभागातील मुख्य लिपिक माया वाकडे, तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपअभियंता महेंद्रसिंह ठाकूर, लेखाधिकारी सुरेंद्र देशमुखे, मुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, सुनिता माने, कार्यालय अधिक्षक जयश्री कुदळे, सिस्टर इनचार्ज हेमलता रायकर, मिना संकपाळ, शिपाई सुभाष भोईर, वसंत बेल्हेकर, मुकादम धनंजय गंगावणे, मजूर भरत डाऊल यांचा समावेश आहे.तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता साळवे, सफाई कामगार जयश्री मलकेकर, शारदा लोळगे, लिलाबाई बागडी, पुष्पा जगताप, महेश भोसले, हिराबाई धेंडे, गीता चावरिया, कचरा कुली अरुण पवार आणि गटर कुली अजिनाथ तेलंगे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक आणि आभार किरण गायकवाड यांनी मानले.

## वारकऱ्यांसाठी शिवसेनेचा पुढाकार



पौड । प्रतिनिधी

मुळशी तालुका दिंडी क्रमांक ९६ च्या वतीने वारकरी बांधवांना तरडगाव (ता. फलटण) येथे मुक्कामासाठी घेण्यात येणार्या चार गुंठे जागेसाठी शिवसेना कोळवण विभाग, अविनाश बलकवडे व संतोष आधवडे यांच्या सौजन्यातून आर्थिक मदत देण्यात आली. या मदतीमुळे वारकरी बांधवांच्या मुक्काम व्यवस्थेची उभारणी अधिक सुलभ होणार आहे.

अविनाश बलकवडे म्हणाले, वारकरी परंपरा ही आपल्या संस्कृतीची पवित्र ओळख असून समाजाला दिशा देणारी शक्ती आहे. वारकरी म्हणजे केवळ नामस्मरण करणारा नाही, तर तो प्रबोधन, समता आणि सेवा यांचा दीपस्तंभ आहे. त्यामुळे वारकर्यांची सेवा म्हणजे समाजसेवेचं कार्य. त्यांच्या सोयीसाठी तरडगाव (ता. फलटण) येथे उभारण्यात येणार्या मुक्काम स्थळाला आम्ही समाजभावनेतून छोटासा हातभार लावला आहे.

पौड येथे झालेल्या कार्यक्रमात ह. भ. प. यशवंत फाले, दशरथ मानकर, अंकुश साठे, दशरथ वहाळे, मारुती तोंडे, मोहन साठे, नरहरी हगवणे, दत्तात्रय भेगडे, चंद्रकांत लोयरे, दत्ता भेगडे, दिनकर जोरी, बबन शिंदे, सुभाष टेमघरे, नारायण साठे, लहू साठे यांच्याकडे धनादेश सुपूर्त करण्यात आला. यावेळी युवासेना पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव अविनाश नानासाहेब बलकवडे, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रकाश भेगडे, ज्येष्ठ शिवसैनिक नामदेव टेमघरे, नारायण धिडे, संजय ढमाले, धर्मा फाले, रोहिदास दुर्गे, माऊली धिडे, युवासेना तालुकाधिकारी दत्ता झोरे, शिव आरोग्य सेना अध्यक्ष ज्ञानेश्वर डफळ, उपतालुका प्रमुख संतोष अधवडे व शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

## महापालिका सेवेतून सह शहर अभियंता, लेखाधिकारी यांच्यासह २२ जण सेवानिवृत्त

पिंपरी । प्रतिनिधी

सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेत अनेक वर्षे जबाबदारीने, प्रामाणिकपणे कामकाज केलेले आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने महापालिकेचा नावलौकिक वाढविणा-या या अधिकारी,कर्मचाऱ्यांचा आदर्श कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी घ्यावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले तसेच सेवानिवृत्तांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात माहे ऑक्टोबर २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे १२ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले १० अशा एकूण २२ कर्मचा-यांचा अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.



या कार्यक्रमास अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अभयचंद्र दादेवार,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त दशरथ कांबळे,कार्यकारी अभियंता तथा कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस अभिमान भोसले, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, प्रशासन अधिकारी उमा दरवेश, कामगार कल्याण विभागातील मुख्य लिपिक माया वाकडे, तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपअभियंता महेंद्रसिंह ठाकूर, लेखाधिकारी सुरेंद्र देशमुखे, मुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, सुनिता माने, कार्यालय अधिक्षक जयश्री कुदळे, सिस्टर इनचार्ज हेमलता रायकर, मिना संकपाळ, शिपाई सुभाष भोईर, वसंत बेल्हेकर, मुकादम धनंजय गंगावणे, मजूर भरत डाऊल यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता साळवे, सफाई कामगार जयश्री मलकेकर, शारदा लोळगे, लिलाबाई बागडी, पुष्पा जगताप, महेश भोसले, हिराबाई धेंडे, गीता चावरिया, कचरा कुली अरुण पवार आणि गटर कुली अजिनाथ तेलंगे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक आणि आभार किरण गायकवाड यांनी मानले.